पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक १० ● गुरूवार, दि. १६ जुलै २०२६ ● मूल्य ५ ●पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

मोठ्या यशामागे अनेक अपयशांची शृंखला असते.

श्री बाबूजी महाराज की पावन धरा पर पहली बार श्री श्याम संकीर्तन

श्री श्याम पधारे म्हारे अंगना

भव्य भजन संध्या

भव्य दरबार

श्री श्याम बाबा स्वयंभू बोरगांव, श्री उज्जैन महाकाल, श्री सालासर बालाजी धाम

भजन प्रवाह

रामभैय्या देशपांडे

अकोला, महाराष्ट्र

16 जुलै शाम : 6.00 बजे से प्रभू इच्छा तक

स्थल : श्रीराम मंदिर विद्युत नगर, पारस

आयोजक : करने वाले श्याम करवाने वाले श्याम...!



अकोला एमआयडीसीत 'एफडीए'चा थरारक सर्जिकल स्ट्राईक

# गौरव शर्मा आणि टोळीला थेट 'मोक्का' ठोकणार का ?



## 50 लाखांचा बनावट गुटखा जप्त; मुख्य सूत्रधार गौरव शर्मा फरार !

प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला :** पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवर आणि गुप्तचर विभागावर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. एमआयडीसीच्या 'ग्रोथ सेंटर ४' मध्ये एम आय डी सी पोलिसांच्या नाकाखाली राजरोसपणे सुरू असलेला महाभयंकर आणि बनावट गुटख्याचा कारखाना अन्न व औषध प्रशासनाने उद्ध्वस्त केला आहे.

अन्न व प्रशासन विभागाचे प्रमुख तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईच्या आदेशाचे तंतोतंत पालन अकोल्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे सहा.आयुक्त देवानंद वीर यांनी केल्याचे चित्र होते. गुटखा शौकिन जे चिमुटभर गुटखा खातात. ते विविध ब्रँडचे गुटखा हे ड्रम मध्ये साठविले होते.

या कारवाईमुळे अकोल्यातील गुटखा माफियांचे धाबे दणाणले आहेत. या कारवाईत विमल, वाह, पान बहार, आणि रिच टेन या नामांकित ब्रँडच्या नावाखाली चालणारे बनावट गुटख्याचे मोठे रॅकेट उघडकीस आले असून ५० लाखांहून अधिक किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता, फरार मुख्य सूत्रधार गौरव शर्मा, गोडाऊन मालक आणि त्यांच्या टोळीवर थेट मकोका अंतर्गत कारवाईचा प्रहार करण्याची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. आज पहाटे केलेल्या कारवाईचे नेतृत्व अन्न व औषध प्रशासनाचे सहा.आयुक्त देवानंद वीर, अन्न निरिक्षक रविंद्र सोळंके, किशोर बोरकाटे, इतर जिल्ह्यातून आलेल्या टिम मध्ये गजानन गोरे, घनश्याम दंडे, अनुराग चव्हाण, विश्वास राठोड, कृणाल बर्डे, लोखंडे आणि इतर अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अन्न व औषध प्रशासनाला एम आय डी सी ग्रोथ सेंटर ४ मध्ये गुटखा कारखान्याचा सुगावा लागला होता. गेल्या ३-४ दिवसांपासून या कारखान्यावर गुप्त पाळत ठेवली जात होती. माहिती फुटू नये म्हणून अकोल्याच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत गुप्त प्लॅनिंग केले. स्थानिक पोलिसांना किंवा कोणालाही काडीचाही सुगावा लागू न देता पहाटेच शेजारील जिल्ह्यांतून अन्न व औषध प्रशासनाचे पथक अकोल्यात पाचारण करण्यात आले. सकाळी ६ वाजल्यापासूनच अधिकाऱ्यांच्या पथकाने 'ग्रोथ सेंटर ४' च्या परिसरात सापळा रचला होता. अखेर सकाळी ९:३० च्या सुमारास गोडाऊनवर अचानक छापा टाकण्यात आला.



### 3 आरोपी रंगेहात जेरबंद; मुख्य सूत्रधार फरार !

» कारखान्यात प्रत्यक्षपणे गुटख्याची निर्मिती आणि पॅकिंग करणाऱ्या तीन छत्तीसगड येथील आरोपींना पथकाने घटनास्थळावरून रंगेहात अटक केली आहे. मात्र, या संपूर्ण काळ्या साम्राज्याचा खरा मास्टरमाईंड आणि गुन्हेगार गौरव शर्मा हा छापा पडताच घटनास्थळावरून फरार होण्यात यशस्वी झाला. पोलीस आता त्याचा आणि गोडाऊन मालकाचा अत्यंत कसून शोध घेत आहेत.

### आता थेट 'मोक्का'!

» या कारवाईनंतर अकोला आणि इतर जिल्ह्यांतील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पकडलेले आरोपी, फरार गौरव शर्मा आणि गोडाऊन मालक यांच्याविरुद्ध कडक कलमांखाली गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. या संघटित गुन्हेगारीचा समूळ उच्चाटन करण्यासाठी त्यांच्यावर थेट 'मोक्का' लावण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची अधिकृत माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहा. आयुक्त देवानंद वीर यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना दिली.

### कॅन्सरला कारणीभूत पदार्थ सापडला

» गुटख्यामध्ये किंवा इतर तंबाखूजन्य पदार्थांमध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट आणि अँटी-केकिंग एजंट चा वापर मुख्यत्वे केला जातो. याचा साठा या ठिकाणी सापडला.गुटखा बनवताना वापरला जाणारा कात , चुना, तंबाखू आणि विविध सुगंधी द्रव्ये यांच्यामध्ये ओलसरपणा असतो. हवेतील आर्द्रतेमुळे या पदार्थांचे एकमेकांत घट्ट गठ्ठे तयार होऊ शकतात. अँटी-केकिंग एजंट गुटख्यामधील घटकांना एकमेकांना चिकटू देत नाही. त्यामुळे गुटख्याची पावडर सुटी आणि मोकळी राहते, ज्यामुळे मशीनद्वारे त्याचे पाकिटात पॅकिंग करणे सोपे होते. रासायनिक परिभाषेत याला मॅग्नेशियम कार्बोनेट म्हटले जाते, तर मोनोसोडियम ग्लूटामेट हा चव वाढवणारा वेगळा पदार्थ आहे.मॅग्नेशियम कार्बोनेट हा गुटख्याच्या पाकिटातील अतिरिक्त ओलसरपणा शोषून घेतो, ज्यामुळे गुटखा बराच काळ सुका आणि कडक राहतो. गुटख्यामध्ये मोठ्या प्रमाणात चुना वापरला जातो. मॅग्नेशियम कार्बोनेटमुळे हा चुना पाकिटात सुकवून निकामी होत नाही, तर तो खाताना जिभेला योग्य 'किक' किंवा चरचरी देण्यास मदत करतो.मॅग्नेशियम कार्बोनेट आणि तंबाखूचे मिश्रण तोंड, जीभ आणि अन्ननलिकेचा कॅन्सर (कर्करोग) होण्यास कारणीभूत ठरते. या रसायनांच्या नियमित सेवनाने पोटाचे अल्सर, हायपर ॲसिडिटी आणि किडनी निकामी होण्याचा धोका वाढतो. याच घातक परिणामांमुळे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यानुसार गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट वापरण्यास पूर्णपणे बंदी आहे. म्हणूनच धाडीमध्ये जेव्हा असे केमिकल्स जप्त होतात, तेव्हा अन्न व औषध प्रशासन अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कठोर गुन्हे दाखल करते.

### जीवघेण्या विषारी गुटख्याची फॅक्टरी !

» ठिकाणी जेव्हा अधिकाऱ्यांनी छापा टाकला, तेव्हा तेथील दृश्य पाहून सर्वांचेच डोळे पांढरे झाले. गोडाऊनमध्ये नामांकित कंपन्यांचे बनावट रॅपर्स (लेबल्स), मोठ्या प्रमाणावर कच्चा माल, गुटखा मिक्सिंगच्या अजस्त्र मशिनरी, ड्रममध्ये साठवून ठेवलेला गुटखा आणि घातक केमिकल्सचा मोठा साठा आढळून आला. लोकांच्या आरोग्याशी खेळणारा हा जीवघेणा उद्योग येथे बिनदिक्कतपणे सुरू होता.महाकाया ग्रीन एनर्जी प्राव्हेट लि. प्लॉट नंबर ७१ एम आय डी सी ४ मध्ये ही कारवाई केल्या गेली.

# बोगस बियाणे कंपन्यांवर बंदी; शेतकऱ्यांच्या नुकसानीचे काय ?

## आमदार नितीन देशमुखांचा सरकारवर हल्लाबोल !

प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला:** जिल्ह्यात सोयाबीनच्या बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची झालेली अतोनात फसवणूक आणि त्यामुळे ओढवलेले दुबार पेरणीचे संकट यावर आज जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत वादळी बैठक पार पडली. या बैठकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार नितीन देशमुख यांनी सरकार आणि प्रशासनाच्या धोरणांवर कडाडून टीका केली. 'बोगस बियाणे विकून शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या कंपन्यांवर नुसती कागदी कारवाई नको, तर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांना तात्काळ हेक्टरी भरीव मदत द्या,' अशी आक्रमक मागणी आमदार देशमुखांनी केली आहे. आमदार देशमुखांच्या रेट्यामुळे



अखेर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील ५ नामांकित बियाणे कंपन्यांवर बंदी घालण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत आमदार नितीन देशमुख आणि लोकप्रतिनिधींच्या दबावानंतर खालील पाच कंपन्यांवर रब्बी आणि खरीप अशा दोन्ही हंगामात बियाणे विक्रीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मध्ये रवी सीड्स, बुस्टर सीड्स, ओसवार सिड्स, एल के जी आणि युकॉन या कंपन्याचा सहभाग आहे. जोपर्यंत शासन किंवा न्यायालयाचा अंतिम निर्णय येत नाही, तोपर्यंत या पाचही कंपन्यांचे एकही बियाणे जिल्ह्यात विकले जाणार नाही. याबाबतचे अधिकृत आदेश उद्या संध्याकाळपर्यंत जिल्हाधिकारी आणि मुख्य कृषी अधिकारी निर्गमित करतील. अशी माहिती आमदार देशमुख यांनी सिटी न्यूज सुपरफास्ट सोबत बोलताना दिली. शेतकऱ्यांना केवळ आश्वासन नको, तर थेट बँक खात्यात भरपाई हवी आहे. सरकारने तातडीने पावले उचलली नाहीत, अन्यथा, आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आमदार नितीन देशमुख यांनी शेवटी दिला.

# खुर्ची हा आमचा अजेंडा नाही- उपमुख्यमंत्री शिंदे

## आमची भूमिका मुख्यमंत्रीपद मिळविण्याची नाही..

वृत्तसंस्था १६ जुलै

**नवी दिल्ली :** आपल्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री व्हावा, अशी इच्छा कार्यकर्त्यांची असते. त्यात काही गैर नाही. मात्र, आमची भूमिका मुख्यमंत्रिपद मिळविण्याची नाही. खुर्ची हा आमचा अजेंडा नाही. राज्यात मुख्यमंत्रिपदाची कोणतीही रिक्त जागा नसून देवेंद्र फडणवीस हे पुढील निवडणुकीपर्यंत मुख्यमंत्री राहतील, असे स्पष्ट करत उपमुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाच्या चर्चांना पूर्णविराम दिला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर बुधवारी त्यांनी डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निवासस्थानी माध्यमांशी संवाद साधला. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्ताराच्या चर्चांना वेग आलेला असतानाच शिंदे यांनी उद्धवसेनेतून शिंदेसेनेत दाखल झालेल्या सहा खासदारांसह शाह यांची भेट घेतली. संबंधित मतदारसंघांतील विकासकामांबाबत गृहमंत्र्यांशी सविस्तर चर्चा झाल्याची माहिती शिंदे यांनी दिली.



### एनडीएमध्ये प्रवेशाचा निर्णय कोणाचा?

शरद पवार राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सहभागी होणार असल्याच्या चर्चेबाबत शिंदे म्हणाले, आम्ही राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे विश्वासू घटक आहोत. मात्र, कोणता पक्ष आघाडीत सहभागी होणार, याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेच घेतील.

## आम्ही सुनेत्रा पवारांना सगळ्या गोष्टी सांगतो

**पुणे :** आमच्या पक्षात कुठलाही गैरसमज नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत सध्या ज्या चर्चा सुरू आहेत, त्या चुकीच्या आहेत. शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील आणि आमची भेट देखील झालेली नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले. तसेच पक्षात अविश्वास आहे, असं कधी ऐकलं नाही, असंही सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं.

अजितदादा असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या. मात्र अजितदादांच्या निधनानंतर विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम लागला, असंही सुनील तटकरेंनी सांगितले. तसेच मी खासदार आहे. मुख्यमंत्र्यांची प्रत्येकवेळी होणारी भेट राजकीय असते, असं नाही. मतदारसंघातील कामे देखील असतात. ज्यावेळी राजकीय बैठका असतात, त्यावेळी सुनेत्रा पवार यांना त्याबाबत माहिती असते.

# सहकार विभागाची धडक कारवाई...!

## यवतमाळ जिल्हातील पुसद, ईसापूर व शेंबाळपिंपरी येथे चार ठिकाणी धाडी!

प्रतिनिधी १६ जुलै

**पुसद :** अवैध सावकारीच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने बुधवारी पुसद, ईसापूर आणि शेंबाळपिंपरी येथे एकाचवेळी चार ठिकाणी धाडी टाकून मोठी कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत चेक, स्टॅम्पपेपर, खरेदीखत, डायऱ्या, चिठ्ठ्या, मोबाईल फोन व इतर महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, त्यांची सखोल छाननी सुरू आहे.

माधव किसन गव्हाणे आणि सुभाष दुलबा डवले यांनी केलेल्या तक्रारींच्या आधारे संतोष अजबराव कदम, समाधान वामनराव पाटील, प्रकाश शंकरराव चोरमले आणि दिलीप सखाराम उत्तरवार यांच्या ठिकाणी झडती घेण्यात आली. शेंबाळपिंपरी बसस्थानकाजवळील हॉटेलमध्ये संतोष कदम यांच्याकडून १९ आक्षेपार्ह कागदपत्रे जप्त करण्यात आली. पुसद येथील समाधान पाटील यांच्या भाड्याच्या घरातून नऊ कागदपत्रांसह खरेदीखत हस्तगत करण्यात आले. दिलीप उत्तरवार यांच्या घरातून २६ कागदपत्रे आणि एक मोबाईल फोन जप्त करण्यात आला. मात्र, ईसापूर येथील प्रकाश चोरमले यांच्या घराच्या झडतीत कोणतेही आक्षेपार्ह साहित्य आढळून आले नाही.

# राज्यात पाणी आणीबाणीची शक्यता !

## गतवर्षीपेक्षा १२ टक्के कमी साठा

प्रतिनिधी १६ जुलै

**मुंबई :** राज्याच्या बहुतांशी भागात गेल्या आठवड्यात पावसाने दमदार हजेरी लावल्याने प्रमुख धरणांतील पाणीसाठ्यात काहींशी वाढ झाली असली तरी राज्यावरील पाणीटंचाईचे संकट अद्याप पूर्णपणे दूर झालेले नाही. राज्यातील प्रमुख दहा धरणांमध्ये सध्या १८४ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा आहे. तो गेल्या वर्षीच्या तुलनेत १२ टक्क्यांनी कमी आहे. तर राज्यातील २२ जिल्ह्यातील ७३७ गावे आणि १११८ वाड्यांना आजही ७९० टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. पाऊस लांबल्यास राज्यात पाणी आणीबाणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील कोयना, जायकवाडी, उजनी, पेंच प्रकल्प समुह, गोसीखुर्द, खडकवासला, मुठा, अप्पर वर्धा, भंडारधारा, आणि इसापूर या प्रमुख धरणात उपयुक्त पाणीसाठा १८४.४७ टीएमसी म्हणजेच ४५ टक्के आहे. गेल्या वर्षी याचवेळी हा साठा २७८.४४ टीएमसी होता. गेल्या वर्षी पेक्षा यंदा हा साठा १२ टक्यानी कमी आहे. त्याचप्रमाणे राज्यातील २२ जिल्ह्यांतील ७३७ गावे आणि १११८ पाड्यांना आजही ७९० टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ३०० टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये पावसाचे प्रमाण अद्याप समाधानकारक नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आजही कायम असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.




### आवश्यक तेथे टँकरने पाणी पुरवठा

ज्या भागांमध्ये पाणीटंचाई गंभीर आहे तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवण्यात आला आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडून जिल्हानिहाय परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. आवश्यक त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत.

### सर्वच भागात परिस्थिती एकसारखी नाही!

राज्यातील सर्वच भागांमध्ये परिस्थिती एकसारखी नाही. केवळ धरण भरणे म्हणजे पाणीटंचाई संपली असे मानता येणार नाही. पावसाचे असमान वितरण, भूजल पातळीतील घट आणि वाढती पाण्याची मागणी यामुळे अनेक गावांना अजूनही टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याचे याअधिकाऱ्याने सांगितले.

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आज 19 वा दिवस

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेतील घोटाळ्यानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद प्रधानांच्या राजीनाम्यासाठी अनिश्चितकालीन उपोषणावर बसलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीची दिल्ली उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. 'प्रत्येक नागरिकाचे जीवन मौल्यवान आहे आणि त्याचे संरक्षण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे ही सरकारची जबाबदारी आहे,' अशी अत्यंत महत्त्वपूर्ण टिप्पणी न्यायालयाने सुनावणी दरम्यान केली. वांगचुक यांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त करत उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला तातडीचे निर्देश दिले आहेत. सरकारी डॉक्टरांनी वांगचुक यांची दररोज वैद्यकीय तपासणी करावी आणि त्यांच्या आरोग्यावर नियमितपणे लक्ष ठेवावे, असे आदेश कोर्टाने दिले आहेत.

# अकोला रेल्वे स्थानकावर लूटमार !

## दुचाकी पॅकिंग कंत्राटदाराचा काळाबाजार उघड विजिलन्सच्या धाडीनंतर सुरक्षा ठेव जप्त, कंत्राट

प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला:**रेल्वे प्रशासनाच्या नाकाखाली प्रवाशांची उघड लुटमार करणाऱ्या अकोला रेल्वे स्थानकावरील दुचाकी पॅकिंग कंत्राटदाराला भुसावळ रेल्वे विभागाने जोरदार दणका दिला आहे. पार्सल कार्यालयात चाललेल्या या महाघोटाळ्याची आणि प्रवाशांच्या पिळवणुकीची गंभीर दखल घेत रेल्वेने 'एम/एस एस. के. एंटरप्रायझेस' या कंत्राटदाराची सुरक्षा ठेव (सिक्युरिटी डिपॉझिट) जप्त करून कंत्राट तडकाफडकी रद्द (फोरक्लोज) केले आहे. रेल्वे विजिलन्स विभागाच्या (दक्षता विभाग) दणक्यामुळे रेल्वे वर्तुळात आणि भ्रष्ट कंत्राटदारांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.



### ३४० रुपयांऐवजी ८०० रुपयांची वसुली !

अकोला रेल्वे स्थानकावरून दुचाकी पार्सल करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना हा कंत्राटदार दोन्ही हातांनी लुटत होता. रेल्वेने अधिकृत पॅकिंग शुल्क ३४० रुपये निश्चित केले असताना, कंत्राटदाराचे गुंड प्रवाशांकडून ७५० ते ८०० रुपये म्हणजेच दुप्पट-तिप्पट रक्कम जबरदस्तीने उकळत होते. गरिबांच्या खिशावर मारला जाणारा हा दरोडा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होता. अखेर १६ एप्रिल २०२६ रोजी विजिलन्स विभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये या काळ्याबाजाराचे पितळ उघडे पडले. कंत्राटदाराचे कर्मचारी कोणत्याही अधिकृत गणवेशाशिवाय (युनिफॉर्म) आणि ओळखपत्राशिवाय (आयडी कार्ड) वावरत होते. रेल्वेची कोणतीही अधिकृत मान्यता नसलेल्या बाहेरील अनधिकृत व्यक्तींमार्फत रेल्वे परिसरात पॅकिंगचे काम करून घेतले जात होते, ज्यामुळे रेल्वेच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.या कंत्राटदाराला १३ डिसेंबर २०२५ ते १२ डिसेंबर २०२८ या तीन वर्षांसाठी वार्षिक १४ लाख ५१ हजार ७८६ रुपये परवाना शुल्कावर हे कंत्राट देण्यात आले होते. तीन महिने उलटत नाहीत तोच कंत्राटदाराची मस्ती विजिलन्सने जिरवली आहे.

# आषाढ महिना: निसर्गाच्या सोहळ्याचा आणि भक्तीचा पावन काळ

हिंदू पंचांगातील चतुर्थ महिना म्हणजेच आषाढ महिना. हा महिना भारतीय संस्कृतीत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि भावपूर्ण मानला जातो. आषाढ सुरू झाला की ग्रीष्माचा तडाखा कमी होऊन वर्षा ऋतूचे आगमन होते, धरणी माता हिरवा शालू नेसते आणि अवघा आसमंत एका वेगळ्याच चैतन्याने न्हाऊन निघतो.

चला तर मग, या लेखात आपण आषाढ महिन्याचे धार्मिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक महत्त्व जाणून घेऊया.

1. निसर्गाचे अद्भुत रूप आणि शेतीचा हंगाम

आषाढ महिना म्हणजे वरुणराजाच्या आगमनाचा काळ. काळेभोर ढग, विजांचा कडकडाट आणि रिमझिम किंवा मुसळधार बरसणाऱ्या धारा हे या महिन्याचे मुख्य वैशिष्ट्य. बळीराजाची लगबग: हा काळ शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मृग नक्षत्रानंतर आषाढात पेरण्या पूर्ण होतात आणि शेतकरी राजा पिकांची निगा राखण्यात व्यस्त होतो. निसर्गाचा उत्सव: डोंगरांवरून वाहणारे धबधबे, नद्यांना आलेला पूर आणि झाडांना फुटलेली नवी पालवी निसर्गाचे सौंदर्य खुलवते. 2. भक्तीचा महापूर: आषाढी एकादशी आणि पंढरीची वारी आषाढ महिन्याचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे आषाढी एकादशी (देवशयनी एकादशी). विठू माऊलीचा गजर: "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम" च्या गजराने अवघ्या महाराष्ट्राचे



आकाश दुमदुमून जाते. वारीची परंपरा: संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या पालख्यांसोबत लाखो वारकरी शेकडो किलोमीटरची पायी वारी करून पंढरपुरात विठ्ठलाच्या दर्शनासाठी पोहोचतात. हा केवळ एक प्रवास नसून भक्ती, समता आणि बंधुभावाचा जगातील सर्वात मोठा सोहळा आहे. 3. गुरु-शिष्य परंपरेचा सण: गुरुपौर्णिमा आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. भारतीय संस्कृतीत गुरुला देवापेक्षाही उच्च स्थान दिले गेले आहे. या दिवशी आपल्याला ज्ञान देणाऱ्या, सन्मार्ग दाखवणाऱ्या गुरूंचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. महाभारतकार महर्षी व्यास यांचा जन्म याच दिवशी झाला होता, म्हणून याला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. 4. आषाढ तळणे: एक अनोखी खाद्यसंस्कृती आषाढ महिन्यात महाराष्ट्रात 'आषाढ तळणे' किंवा 'आषाढ साजरा करणे' ही एक चवदार परंपरा आहे. पावसाळ्याच्या दिवसांत शरीराला ऊर्जेची गरज असते. तसेच, या महिन्यानंतर येणाऱ्या श्रावण महिन्यात अनेकांचे उपवास असतात आणि मांसाहार किंवा तळलेले पदार्थ वर्ज्य केले जातात. त्यामुळे आषाढात घरोघरी गुळाच्या कापण्या, तिखट-मिठाच्या पुऱ्या, भजी आणि काही भागांत कोंबडे-वडे किंवा मांसाहारी बेत आवर्जून केले जातात.

5. दीप अमावस्या: आषाढाची सांगता- आषाढ महिन्याचा शेवट दीप अमावस्येने होतो. या दिवशी घरातील सर्व दिव्यांची स्वच्छता करून त्यांची पूजा केली जाते. "तमसो मा ज्योतिर्गमय" अर्थात अंधाराकडून प्रकाशाकडे नेणाऱ्या दिव्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून, आषाढ संपतो आणि सणांची रेलचेल असलेल्या पवित्र श्रावण महिन्याचे स्वागत केले जाते.

### थोडक्यात सांगायचे तर...

आषाढ महिना हा केवळ एका ऋतूचा बदल नाही, तर तो मानवी मन, निसर्ग आणि अध्यात्म यांचा त्रिवेणी संगम आहे. रिमझिम पडणारा पाऊस, विठ्ठल नामाचा गजर आणि खमंग खाद्यपदार्थांची रेलचेल यामुळे आषाढ महिना प्रत्येकाच्या मनात एक वेगळे आणि हक्काचे स्थान निर्माण करतो.

# आगामी काळ अविवाहितेचे युग ठरणार?

एका आंतरराष्ट्रीय सर्वेक्षणानुसार पुढील सहा वर्षात जगातील जवळपास ४५ टके मुली अविवाहित राहू शकणार आहेत.

अनेक पालक मुलींसाठी संबंध शोधत आहेत, पण मुलींनाच विवाहात रस नसल्यामुळे प्रत्येक प्रस्ताव नाकारला जात आहे. समाजातील मोठ्या घटकाला या बदलाची गंभीरता अजून पाहिजे तशी समजलेली नाही. यामुळे वेळेवर जागे होणे आवश्यक आहे. मुलीच्या विवाहासाठी योग्य वय २३ ते २६ वर्षे मानले जाते. शक्य असल्यास त्याहीपेक्षा लवकर, यासाठी सामूहिक पातळीवर जागरुकता आणि प्रयत्न गरजेचे आहेत. हा विषय कोणाच्या विरोधात नसून, भविष्यातील स्थैर्य आणि संतुलनाच्या चिंतेतून मांडला आहे. समाज, कुटुंब आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल राखणे हीच खरी प्रगती आहे.

### याला 'सुशिक्षित समाज' म्हणायचे का?

जर ५० जोडप्यांमध्ये फक्त एकच मूल असेल, तर पुढील पिढीत मुले खूपच कमी राहतील. असेच चालू राहिले, तर तिसरी पिढीच जवळजवळ नाहीशी होईल. गल्ल्या, वाड्या रिकाम्या होत आहेत, लोक रस्त्यावर जास्त वेळ घालवत आहेत. गावे हळूहळू संपत आहेत. शहरांमध्ये उंच इमारती आहेत, पण संयुक्त कुटुंब व्यवस्था संपत चालली आहे. नव्या सुना 'फक्त एकाच मूल' हवे असे म्हणतात. सत्य हे आहे की आता मुले प्रेमाचे प्रतीक राहिली नाहीत. मुलांना जन्म देणे ही एक जबाबदारी किंवा मजबुरी झाली आहे. सर्वांत मोठी चूक मुलीच्या वडिलांची आहे. जे स्वतः २०-२२ व्या वर्षी लग करून कुटुंब उभे केले तेच आता मुलीचे लग्न ३० पर्यंत न लावता अभिमान बाळगतात.

### अशी आहेत कारणे

सद्य स्थितीतील मुली उच्च शिक्षण घेत आहेत आणि करिअरला प्राधान्य देत आहेत, त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असून, कोणावरही अवलंबून राहू इच्छित नाहीत, त्या स्वातंत्र्यप्रिय आहेत. त्या स्वतः चे निर्णय स्वतः घ्यायला इच्छुक आहेत, विवाह, मातृत्व आणि कौटुंबिक बंधने ही त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरतात, असे त्यांना वाटते, ही प्रवृत्ती कायम राहिल्यास पारंपरिक कुटुंब व्यवस्था आणि सामाजिक रचना ढासळू शकते, लोकसंख्या घट, अविवाहित मुलांची संख्या वाढ आणि वृद्धावस्थेत एकटेपणाच्या समस्या निर्माण होऊ शकतात, शेवटी प्रश्न उरतो प्रगती, पद आणि पैसा यांचा उपयोग काय, जर आयुष्याच्या शेवटी साथ देणारा कोणीच नसेल तर?

### भविष्यातील गंभीर समस्या

जेव्हा मुलांचे लग्न २० व्या वर्षी होत तेव्हा एका शतकात ५ पिढ्या असत. जेव्हा मुलांचे लग्न २५ व्या वर्षी होत होते तेव्हा ४ पिढ्या असत. आता ३० व्या वर्षी लग्न होत असल्याने एका शतकात फक्त ३ पिढ्या उरतात. मुली ३० ते ३५ वर्षापर्यंत अविवाहित आहेत. मुलगे ३५ वर्षांनंतरही अविवाहित आहेत. उशिरा लग्न आणि मग घटस्फोट, तुटणारी कुटुंबे, दुःखी आई-वडील, एकटे पालक, पूर्ण पिढी रिकामटेकडेपण अनुभवते.

### विवाहाचे योग्य वय

मुलांसाठी २५ वर्षापूर्वी
- मुलींसाठी २० वर्षापूर्वी

नाहीतर इतिहास लिहील, की 'तो समाज ज्याने स्वतःच स्वतःला संपवले,' म्हणून विचार करा आणि शहाणपणाने बागा. आपल्या मुलांचे लग्न वेळेवर करा कारण कुटुंब नसेल, तर समाज टिकणार नाही.

# लोकसंख्येच्या प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्मिती आव्हान

भारतातील रोजगार विषयक सद्यस्थिती ही एकाच वेळी सकारात्मक बदल आणि काही गंभीर आव्हाने दर्शवणारी आहे. देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असली, तरी लोकसंख्येच्या प्रमाणात दर्जेदार रोजगार निर्माण करणे हे सध्याचे सर्वात मोठे उद्दिष्ट आहे.

**या सद्यस्थितीचे प्रमुख पैलू खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येतील**

१. सकारात्मक बदल आणि अधिकृत आकडेवारी

नियमित श्रम बळ सर्वेक्षणाच्या (PLFS) आणि सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या काही वर्षांत रोजगाराच्या संख्येत वाढ झाली आहे.

**बेरोजगारीच्या दरात घट :** देशातील सरासरी बेरोजगारीचा दर (Unemployment Rate) २०१७-१८ मधील ६.०% वरून घसरून आता सुमारे ३.२% पर्यंत खाली आला आहे.

**रोजगार निर्मिती :** गेल्या ६-७ वर्षांत देशात रोजगाराच्या संख्येत मोठी भर पडली असून, उत्पादक रोजगारात मनुष्यबळाचा वापर वाढला आहे.

**महिलांचा सहभाग :** औपचारिक (Formal) क्षेत्रात आणि नियमित पगारी नोकऱ्यांमध्ये महिलांचा सहभाग वाढला असून, ग्रामीण भागातील महिलांच्या स्वरोजगारातून मिळणाऱ्या उत्पन्नातही सुधारणा झाली आहे.

२. रोजगाराची सद्यस्थिती बदलणारी प्रमुख क्षेत्रे

सध्या भारतात पारंपारिक क्षेत्रांशिवाय काही नवीन क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होत आहेत.



**डिजिटल अर्थव्यवस्था आणि IT:** सॉफ्टवेअर सेवा, स्टार्टअप्स, एआय (AI) आणि क्लाउड तंत्रज्ञानामुळे तंत्रकुशल तरुणांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होत आहेत.

**MSME आणि उत्पादन क्षेत्र :** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) हे आजही देशात सर्वाधिक रोजगार देणारे मोठे क्षेत्र आहे. तसेच 'मेक इन इंडिया' अंतर्गत उत्पादन (Manufacturing) क्षेत्राला गती दिली जात आहे.

**पायाभूत सुविधा (Infrastructure) :** रस्ते, बंदरे आणि बांधकाम क्षेत्रातील सरकारी गुंतवणुकीमुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगारांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

**नवीकरणीय ऊर्जा (Renewable Energy) :** हरित ऊर्जेकडे (Green Energy) होणाऱ्या स्थलांतरामुळे या क्षेत्रात नवीन नोकऱ्या निर्माण होत आहेत.

३. प्रमुख आव्हाने आणि समस्या

बेरोजगारीचा दर कमी झाला असला, तरी रोजगाराच्या रचनेमध्ये काही गंभीर आव्हाने आहेत.

सुशिक्षित तरुणांची बेरोजगारी: आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (ILO) अहवालानुसार आणि देशांतर्गत अभ्यासानुसार, एकूण बेरोजगारांमध्ये उच्चशिक्षित किंवा पदवीधर तरुणांचे प्रमाण चिंताजनक आहे. पदवी असूनही कौशल्यांच्या अभावामुळे नोकरी न मिळणे हे मोठे आव्हान आहे.

गुणात्मक रोजगाराची कमतरता: देशात रोजगार वाढले असले, तरी त्यातील बहुतांश नोकऱ्या या अकुशल किंवा अर्ध-कुशल स्वरूपाच्या (Unskilled/Semi-skilled) आहेत. चांगला पगार आणि सामाजिक सुरक्षा असणाऱ्या 'औपचारिक' नोकऱ्यांचे प्रमाण अजूनही वाढवणे गरजेचे आहे.

कृषी क्षेत्रावरील अवलंबित्व: आजही देशातील एक मोठा वर्ग शेती आणि संलग्न क्षेत्रांवर अवलंबून आहे, ज्याचे देशाच्या जीडीपीमधील योगदान इतर क्षेत्रांच्या तुलनेत कमी आहे.

४. सरकारच्या प्रमुख योजना व पुढाकार

रोजगार वाढवण्यासाठी आणि तरुणांना कौशल्य देण्यासाठी सरकारकडून विविध पावले उचलली जात आहेत.

**प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना (PM-VBRY) :** या योजनेअंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणाऱ्या तरुणांना आणि त्यांच्या कंपन्यांना प्रोत्साहनपर निधी (Incentives) दिला जात आहे, ज्यामुळे लाखो तरुणांना औपचारिक क्षेत्रात सामाजिक सुरक्षा कवच मिळत आहे.

**कौशल्याधारित कार्यक्रम :** 'स्किल इंडिया मिशन' आणि राष्ट्रीय कौशल्य विकास मोहिमेद्वारे तरुणांना उद्योग जगताला आवश्यक असणारे आधुनिक कौशल्य शिकवण्यावर भर दिला जात आहे. स्टार्टअप आणि स्वरोजगार: 'मुद्रा योजना' आणि स्टार्टअप इंडियासारख्या योजनांमुळे तरुण स्वतःचे उद्योग सुरू करत असून, ते नोकरी मागणाऱ्यांऐवजी नोकरी देणारे बनत आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, भारताला मिळालेल्या मोठ्या तरुण लोकसंख्येचा (Demographic Dividend) फायदा उठवण्यासाठी दरवर्षी लाखो नवीन रोजगारांची गरज आहे.

सध्या आकडेवारी सकारात्मक सुधारणा दाखवत असली, तरी तरुणांना उद्योग-अनुकूल कौशल्ये (Industry-ready Skills) देणे आणि रोजगाराचा दर्जा सुधारणे हे देशासमोरील मुख्य कार्य आहे.

# राज्यातील पहिल्या महिला निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण!



आज स्मृतिदिन

नीला सत्यनारायण यांचा जन्म मुंबईमध्ये ५ फेब्रुवारी १९४९ रोजी झाला होता. त्या १९७२ च्या बॅचच्या (आता निवृत्त) सनदी अधिकारी असून त्या महाराष्ट्राच्या पहिल्या स्त्री निवडणूक आयुक्त होत्या. याशिवाय त्या मराठी साहित्यिक आहेत. त्यांनी सुमारे १५० कविता लिहिल्या असून त्यांनी काही मराठी चित्रपटांसाठी आणि दोन हिंदी चित्रपटांसाठी संगीत दिग्दर्शन केले आहे. नीला सत्यनारायण यांच्या कथेवरून 'बाबांची शाळा' हा मराठी चित्रपट निघाला. त्याचे संगीत दिग्दर्शन त्यांनीच केले होते. त्यांच्या आईचे नाव सुशीला आणि वडिलांचे नाव वासुदेव आबाजी मांडके होते. ते पोलिस खात्यात होते. नीला सत्यनारायण यांचे शालेय शिक्षण मुंबई, पुणे, नाशिक येथे झाले. त्यांनी शालान्त परीक्षा दिल्ली बोर्डातून दिली. त्या परीक्षेत त्या १९६५ साली संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळवून बोर्डात पहिल्या आल्या. नंतर त्यांनी इंग्रजी वाङ्मय या विषयात पदवी व पदव्युत्तर अभ्यास पूर्ण केला. १९७२ साली त्या पहिल्याच प्रयत्नात आय.ए.एस.ची परीक्षा पास झाल्या.

नीला सत्यनारायण यांनी सनदी अधिकारपदाच्या ३७ वर्षांच्या कारकिर्दीत मुलकी खाते, गृहखाते, वनविभाग, माहिती आणि प्रसिद्धी, वैद्यक आणि समाजकल्याण, ग्रामीण विकास यासारख्या अनेक खात्यांत सनदी अधिकारी म्हणून काम केले. धारावीत काम करताना तिथल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना त्यांनी निर्यातक्षम चामड्याच्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून येणाऱ्या स्त्रियांना सक्षम करण्यासाठी क्रांतिज्योती महिला प्रशिक्षण अभियान सुरू केले.

१९७२ च्या बॅचच्या सनदी अधिकारी असलेल्या नीला सत्यनारायण या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त होत्या. निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची कारकीर्द गाजली होती. प्रशासकीय अधिकारी म्हणून ३७ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. गृहखाते, वनविभाग, माहिती व जनसंपर्क, समाजकल्याण, ग्रामविकास अशा विविध खात्यांमध्ये त्यांनी काम केलं होतं. कर्तव्यकठोर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नीला सत्यनारायण तितक्याच संवेदनशील होत्या. प्रशासकीय कामाच्या धबडग्यातून वेळात वेळ काढून त्या लेखनाचा छंद जोपासत होत्या. नीला सत्यनारायण यांनी हिंदी, मराठी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून १३ पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे मराठीतील 'एक पूर्ण अपूर्ण' हे आत्मचरित्रपर पुस्तक खूपच लोकप्रिय ठरले होते. उद्योजक व्यवसायाशी संबंधित त्यांनी लिहिलेले 'सत्यकथा' आणि वनविभागाच्या सचिव म्हणून आलेल्या अनुभवांवरील 'एक दिवस (जी)वनातला' हे पुस्तकही गाजले होते. त्यांनी अनेक वृत्तपत्रांसाठी स्तंभलेखन केलं होतं. कविता लेखन हा त्यांच्या आवडीचा विषय होता. सत्यनारायण यांनी सुमारे १५० कविता लिहिल्या होत्या. काही मराठी चित्रपटांसाठी आणि दोन हिंदी चित्रपटांसाठी संगीत दिग्दर्शनही केलं होतं. अशा या महाराष्ट्राच्या माजी निवडणूक आयुक्त व लोकप्रिय लेखिका नीला सत्यनारायण यांचे १६ जुलै २०२० मध्ये कोरोनामुळे मुंबईत निधन झाले. त्या ७१ वर्षांच्या होत्या.

# चंद्राच्या कलांवर आधारित एक प्रमुख दिनदर्शिका - हिजरी कॅलेंडर

## आजच्या दिवसांपासून झाली होती सुरुवात

इस्लामिक किंवा हिजरी कॅलेंडर हे प्रामुख्याने चंद्राच्या कलांवर (चांद्र चक्र) आधारित एक प्रमुख दिनदर्शिका आहे. जगभरातील मुस्लिम समाजात सण, उपवास आणि धार्मिक विधींच्या तारखा ठरवण्यासाठी या कॅलेंडरचा वापर केला जातो. 'हिजरत' म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रयाण करणे. पैगंबर महंमद यांनी मक्केहून मदिनेला स्थलांतर केले (१६ जुलै, इ.स. ६२२) या ऐतिहासिक घटनेपासून हिजरी कालगणनेची सुरुवात झाली. या कॅलेंडरमध्ये १२ महिने असतात आणि वर्षाचे एकूण दिवस ३५४ किंवा ३५५ असतात. हे वर्ष ग्रेगोरियन (इंग्रजी) कॅलेंडरपेक्षा सुमारे ११ दिवसांनी लहान असते. रमजान, ईद-उल-फित्र, बकरीद (ईद-उल-अधा) आणि मोहर्रम यांसारखे महत्त्वाचे सण याच कॅलेंडरनुसार साजरे होतात.

इस्लामी कालगणना किंवा चांद्र हिजरी कालगणना इस्लाम धर्मात प्रचलित असलेली व चंद्राच्या परिभ्रमणकाळावर आधारित, अशी कालगणनेची पद्धत आहे. हिजरत या शब्दाचा अरबीमध्ये प्रयाण असा अर्थ आहे. ज्या दिवशी महंमद पैगंबर यांनी मक्केहून मदिनेस जुलै १६, इ.स. ६२२ रोजी प्रयाण केले. त्या दिवसासून या कालाची गणना सुरू झाली, असे समजत असल्याने त्या कालगणनेस हिजरी असे म्हणले जाते. बहुतांश मुस्लिम राजघराण्यांतील नाण्यांवर हिजरी तारखा पहावयास मिळतात.

पारंपारिकपणे, इस्लामी दिवस सूर्यास्ताच्या वेळी सुरू होतो आणि पुढील सूर्यास्ताच्या वेळी संपतो. अशा प्रकारे प्रत्येक इस्लामी दिवस रात्रीच्या वेळी सुरू होतो आणि दिवसाच्या शेवटी संपतो. शेवटच्या दोन दिवसांचा अपवाद वगळता सात-दिवसांच्या आठवड्यातील दिवसांना आठवड्यातील त्यांच्या क्रमानुसार नाव दिले जाते. आठवड्याच्या सहाव्या दिवशी, 'गॅदरिंग डे' (यौम अल-जुमाह), मुस्लिम दुपारच्या वेळी स्थानिक मशिदीत शुक्रवार-प्रार्थनेसाठी एकत्र होतात. 'जूमा' हा सहसा साप्ताहिक सुट्टीचा दिवस मानला जातो. हे वारंवार अधिकृत केले जाते, अनेक मुस्लिम देश शुक्रवार आणि शनिवार (उदा. इजिप्त, सौदी अरेबिया) किंवा गुरुवार आणि शुक्रवार अधिकृत शनिवार व रविवार म्हणून स्वीकारतात, ज्या दरम्यान कार्यालये बंद असतात; इतर देश (उदा., इराण) एकट्या शुक्रवारला विश्रांतीचा दिवस ठरवतात. काही इतरांनी (उदा., तुर्की, पाकिस्तान, मोरोक्को, नायजेरिया, मलेशिया) शनिवार-रविवारचा शनिवार व रविवार स्वीकारला आहे, तर पूजेसाठी वेळ मिळावा म्हणून शुक्रवार हा कामाचा दिवस बनवला आहे.




महिने- इस्लामी कॅलेंडरचा प्रत्येक महिना नवीन चंद्र चक्राच्या जन्मापासून सुरू होतो. पारंपारिकपणे, हे चंद्राच्या वास्तविक निरीक्षणावर आधारित आहे (हिलाल) मागील चंद्र चक्राचा शेवट आणि म्हणून मागील महिन्यात, त्याद्वारे नवीन महिना सुरू होतो. परिणामी, चंद्राची दृश्यमानता, पृथ्वीची खगोलीय स्थिती आणि हवामानाची स्थिती यावर अवलंबून प्रत्येक महिन्यात २९ किंवा ३० दिवस असू शकतात. बारा हिजरी महिन्यांपैकी चार पवित्र मानले जातात. त्यात रजब (७), आणि सलग तीन महिने धूल खादा (११), दुल हिज्जा (१२), मूहाररम़

इस्लामिक कॅलेंडर , इस्लामिक जगात धार्मिक कार्यासाठी वापरली जाणारी कालगणना पद्धत . (बहुतेक देश आता नागरी कार्यासाठी ग्रेगोरियन कॅलेंडर वापरतात.) हे १२ महिन्यांच्या वर्षावर आधारित आहे: मुहर्रम , सफर, रबीअल-अव्वल, रबीअल-थानी, जमादा अल-अव्वल, जमादा अल-थानी, रजब, शाबान, रमजान ( उपवासाचा महिना ), शव्वाल, धू अल-कादाह आणि धू अल-हिज्जा. प्रत्येक महिना साधारणपणे अमावस्येच्या वेळी सुरू होतो. १२ वा महिना वगळता, इतर महिने एकाआड एक ३० आणि २९ दिवसांचे असतात. धू अल-हिज्जा , ज्याचा कालावधी चंद्राच्या खऱ्या कलांशी दिनदर्शिका जुळवून ठेवण्याच्या उद्देशाने ३० वर्षांच्या चक्रात बदलला जातो . या चक्रातील ११ वर्षांमध्ये धू अल-हिज्जा ३० दिवसांचा असतो आणि उर्वरित १९ वर्षांमध्ये तो २९ दिवसांचा असतो. अशाप्रकारे, वर्षात एकतर ३५४ किंवा ३५५ दिवस असतात. इतर कोणतेही अधिक दिवस किंवा महिने समाविष्ट केले जात नाहीत, त्यामुळे नामनिर्देशित महिने एकाच ऋतूत न राहता, दर ३२.५ सौर वर्षांनी संपूर्ण सौर किंवा ऋतूमानानुसार (सुमारे ३६५.२५ दिवसांचे) मागे फिरतात.

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. १६ जुलै २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

# शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी युवकांचे जलाशयात आंदोलन

प्रतिनिधी १६ जुलै

**हिवरखेड :** हिवरखेड अकोला–खंडवा रेल्वे मार्गाच्या कामादरम्यान योग्य निचऱ्याची व्यवस्था न केल्यामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या अधिग्रहण न झालेल्या शेतीत मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. जवळपास 300 एकर पेक्षा अधिक शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी आजही पाच ते सात फूट पाणी शेतात साचून असल्यामुळे शेती पूर्णपणे अनुपयोगी झाली असून



पिकांचे तसेच जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान रेल्वेने साचलेले पाणी काढणे सुरू केले आहे.

वारंवार संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही ठोस उपाययोजना न झाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी आज अनोख्या पद्धतीने जलसमाधी आंदोलन करून प्रशासनाचा निषेध नोंदविला. शेतात साचलेल्या पाण्यात उतरून आंदोलन करत शेतकऱ्यांनी तातडीने निचऱ्याची व्यवस्था करण्याची, झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई देण्याची आणि या प्रकरणातील जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली.

या आंदोलनात अॅड. धनंजय गावंडे, पुरुषोत्तम दामोदर, सौरभ गावंडे, शुभम अस्वार, ओके बंधू, अनिल दुधे तसेच परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन शेतातील पाण्याचा निचरा, नुकसानीचे सर्वेक्षण आणि नुकसानभरपाईबाबत निर्णय घेतला नाही, तर आंदोलन तीव्र करण्यात येईल. या संपूर्ण प्रकरणामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### न्याय मिळत नसल्याने शेतकरी संतप्त

संबंधित विभागाकडे वारंवार पाठपुरावा करून देखील न्याय मिळत नाही. म्हणून संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जलाशयात उतरून आंदोलन केले. शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणा दिल्या. मागण्यांकडे दुर्लक्ष झाले तर तीव्र आंदोलन करू असा इशारा दिला.

# कृषिमंत्र्यांच्या बैठकीत आ. पिंपळे यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडली



**मुर्तीजापुर :** राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या ऑनलाइन आढावा बैठकीत आमदार हरीश पिंपळे यांनी बोगस व निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या दुबार पेरणीच्या संकटाचा मुद्दा ठामपणे मांडला. या बैठकीला राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार रणधीर सावरकर उपस्थित होते.

आमदार हरीश पिंपळे यांनी सांगितले की, मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघासह अकोला जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे बोगस व निकृष्ट बियाण्यांमुळे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणात शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी, दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच बियाणे तपासणी व्यवस्थेत व्यापक सुधारणा करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली.

बैठकीत आमदार पिंपळे यांनी सध्याच्या बियाणे तपासणीच्या कार्यपद्धतीत (SOP) बदल करून अधिक प्रभावी आणि पारदर्शक मानक कार्यप्रणाली लागू करण्याची गरज व्यक्त केली. त्यांनी पुढील मागण्या मांडल्या. अकोला येथील महाबीज प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यात यावी. बियाण्यांच्या नमुन्यांच्या तपासणीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्यात यावी, जेणेकरून अहवाल वेळेत मिळून शेतकऱ्यांना न्याय मिळेल. तपासणीत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तात्काळ जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी.

आमदार पिंपळे यांनी सांगितले की, बियाणे उत्पादन प्रक्रिया कृषी विद्यापीठातील ब्रीडर सीडपासून सुरू होऊन फाउंडेशन सीड आणि त्यानंतर प्रमाणित बियाण्यांपर्यंत पोहोचते. या संपूर्ण प्रक्रियेत महाराष्ट्र राज्य बियाणे प्रमाणीकरण संस्था शेतांची पाहणी करते तसेच प्रयोगशाळेत उगवणक्षमता, शुद्धता, आर्द्रता आदी गुणवत्तेच्या निकषांची तपासणी करूनच ब्ल्यू टॅग प्रदान केले जावे.

आमदार हरीश पिंपळे यांनी विद्यमान बियाणे अधिनियम, 1966 मधील शिक्षेच्या तरतुदींवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, सध्याच्या कायद्यानुसार प्रथम दोषी आढळल्यास कमाल ५०० रुपयांचा दंड आणि पुनरावृत्ती झाल्यास सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा १,००० रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा अशी तरतूद आहे. कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणाऱ्या कंपन्यांसाठी ही शिक्षा कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध निर्माण करणारी नाही. त्यामुळे कायद्यात सुधारणा करून कठोर शिक्षेची तरतूद करण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली.

बैठकीत अकोला जिल्ह्यातील १३७ बियाणे नमुने तपासणीत अपयशी (फेल) ठरल्याचा मुद्दाही गांभीर्याने मांडण्यात आला.

# अनधिकृत बांधकाम प्रकरणी नगर परिषदेची नोटीस

## सात दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आदेश

वि. प्रतिनिधी १६ जुलै

**अकोट :** शहरातील मौजे अकोट भाग २ येथील सर्वे क्रमांक ६५१/२, नझुल शिट क्रमांक १३ मधील प्लॉट क्रमांक १ व २ (नझुल प्लॉट क्र. ४/४/१ व ४/४/२) वरील बांधकामासंदर्भात अकोट नगर परिषद प्रशासनाने भूखंडधारकांना नोटीस बजावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गजानन नगर येथील विशाल उर्फ गोलू गणेश भगत यांनी दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी नगर परिषदेकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीमध्ये संबंधित जागेवरील बांधकाम मंजूर नकाशानुसार नसल्याचा तसेच दोन स्वतंत्र प्लॉटचे एकत्रीकरण न करता बांधकाम करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या तक्रारीच्या अनुषंगाने नगर परिषद प्रशासनाने सै. मुजाहीद अली सै. फिरोज अली नैय्यर व सै. फुरकान अली सै. फिरोज अली नैय्यर यांना नोटीस जारी केली आहे. नोटीसमध्ये संबंधित बांधकामामुळे लगतच्या भूखंडधारकांच्या सुविधा व अधिकारांवर परिणाम होऊ नये तसेच बांधकाम स्वतःच्या मालकीच्या व हद्दीतील जागेतच करण्यात यावे, असे नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीची पडताळणी व निराकरण करण्यासाठी संबंधितांनी बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, मालकी हक्काची कागदपत्रे, मोजणी नकाशा, मंजूर अभिन्यासाचा आदेश व मंजूर नकाशा यांसह आवश्यक कागदपत्रे सात दिवसांच्या आत नगर परिषद कार्यालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधितांकडून कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाकडून प्रकरणाची तपासणी करून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे समजते.

## मृत्यूच्या दाखल्यासाठी नागरिकांची भटकंती

**हिवरखेड :** येथील खाजगी डॉक्टर आपल्याच रुग्णांची दिशाभूल करीत असल्याचे चित्र समोर आले आहे. नातेवाईकांना मृत दाखल्यासाठी कामकाज पडले तर दाखल्यावर स्वाक्षरी देण्यास डॉक्टरांचा नकार असतो. असा गंभीर प्रश्न नागरिकांना पडला असून, नागरिकांची दाखल्यासाठी बरीच दमछाक होत आहे. संध्या एसआरचे काम सुरू असून नगर परिषद कर्मचारी सुद्धा कामात मग्न आहेत. आणि दुसरीकडे शाळा सुरू झाल्या विद्यार्थ्यांना विविध शालेय कागदोपत्री व्यवहार करण्यासाठी विविध उपयोगी कागदपत्रे उपलब्ध व्हावी म्हणून धावपड करावी लागत आहे. या मध्ये महत्वाचा वारसा किंवा मृत्यू दाखला पाहिजे असला तर नगरपरिषदचे कर्मचारी म्हणतात मृत्यूची नोंद करण्यासाठी एखाद्या डॉक्टरांची स्वाक्षरी लागणार, खाजगी डॉक्टर म्हणतात शासकीय दवाखान्यात जा तिथे स्वाक्षरी मिळणार.

# एफडीएने केली गणेश स्विट मार्टवर कारवाई

## अन्न पदार्थाबाबत तक्रार नसताना स्वच्छतेचा मुद्दा

प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला :** गणेश स्विट मार्ट वर एफ डी ए ची कारवाई एफ डी ए च्या कारवाई बाबत उलटसुलट चर्चा जाणीवपूर्वक एफ डी ए ची कारवाईची चर्चा समोर जठारपेठेतील प्रतिष्ठित गणेश स्विट मार्टवर एफ डी ए कारवाई केली. पण, ही कारवाई म्हणजे अन्न व औषध प्रशासनाचा देखावा असल्याची माहिती समोर आली आहे.

गणेश स्विट मार्टवर अन्न पदार्थात भेसळ सापडली नाही. अन्न पदार्थ चांगले होते म्हणून स्वच्छतेचा मुद्दा समोर केला गेला.

जठारपेठ चौकातील गणेश स्विट मार्टवर अन्न व औषध प्रशासनाने जाणीवपुर्वक कारवाई केल्याची माहिती प्राप्त झाली आहे.



स्वच्छतेचे सर्व नियम पाळले जात असताना व्यावसायिक स्पर्धेतून ही रेड झाल्याची चर्चा मिठाई व्यावसायिकांमध्ये आहे. तर खाद्य पदार्थाची कुठली ही तक्रार नसताना एफ डी ए ने केलेल्या कारवाईची चौकशी वरिष्ठांनी करण्याची गरज आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्याच्या मनमानी कारभाराचा फटका आज गणेश स्विट मार्टला बसला आहे. त्याची चौकशी होण्याची गरज आहे. ज्या ठिकाणी अन्न पदार्थात भेसळ होते अशा ठिकाणी अन्न सुरक्षा अधिकारी कारवाई करत नाही. आणि ज्या ठिकाणी कुठली ही भेसळ होत नाही अशा ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केल्याचे चित्र होते. गणेश स्विट मार्टला बदनाम करण्याचा उद्योग कोणी केला अशी विचारणा होत आहे. अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांजवळ कारवाईचे समर्थन करण्यासाठी कुठलाच शब्द नव्हता. पहा अन्न सुरक्षा अधिकारी कशा प्रकारे कारवाईचे खोटे समर्थन करत आहे.

# श्री जगन्नाथ मंदिरात उत्सव



प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला :** येथील पीकेव्ही परिसरातील पुरातन श्री जगन्नाथ मंदिरात गुरूवारी उत्सव आयोजित करण्यात आला आहे. दुपारी भजन तसेच आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते महाआरती करण्यात येणार आहे अशी माहिती संस्थान कडून देण्यात आली. गुरूवारी सकाळ पासून शहर तसेच परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

गेल्या तीन चार दिवसांपासून मंदिरात उत्सव साजरा केला जात आहे. गुरूवारी जगन्नाथ पुरी येथे रथयात्रा काढण्यात येते. त्याच धर्तीवर येथील जगन्नाथ प्रभू मंदिरात उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील मंदिर अतिशय पुरातन आहे. विविध उत्सव साजरे करण्यात येतात. या भागातील श्री जगन्नाथ प्रभूंचे एकमेव मंदिर असल्याने भाविकांचे श्रद्धास्थान आहे. उत्सवासाठी मंदिराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.

### मंदिरात कसे जाल

मंदिरात जाण्यासाठी मुकुंद नगर टेलिकॉम कॉलनीतून जाता येते. तेथून पुढे रेल्वे लाईनच्या दिशेने गेले की श्री जगन्नाथ मंदिराकडे जाता येते. पोद्दार शाळा आणि लगतचा हा परिसर आहे. रेल्वे पटरीच्या बाजूला वाहने उभी करून मंदिरात जाता येते.

# अखेर अकोला आलेगाव बस फेरी पूर्ववत सुरु

## दैनिक सिटीन्यूज सुपर फास्ट वृत्ताची दखल

प्रतिनिधी १६ जुलै



**आलेगाव :** राज्य परिवहन मंडळाची अकोला येथून सकाळी ८:५० आलेगावसाठी निघणारी व आलेगाव येथून १०:३० वाजता अकोला जाणारी, विद्यार्थी व प्रवाशांना वरदान ठरलेली बस फेरी दिनांक ७ रोज पासून बंद करण्यात आली.

त्यामुळे,विद्यार्थी व प्रवाशांचे प्रवास करण्याचे नियोजन कोसळले. त्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त करीत नागरिकांनी संताप व्यक्त करीत बस सेवा पूर्ववत सुरू न झाल्यास आंदोलन करणार असल्याचे चर्चा जोमात होती सदर बस फेरी बंद झाल्यामुळे,पातूर येथे आय टी आय विद्यार्थी देऊळगाव अंबाशी येथील पातूर आलेगाव येथे शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांना अवैध वाहनातून प्रवास करावा लागत आहे.सदर बस फेरी पूर्ववत सुरू न झाल्यास नागरिकां कडून मोठे आंदोलन करणार असल्याचे समोर आले. या आशयाचे वृत्त दैनिक सिटी न्यूज सुपर फास्ट वृत्तपत्रांमध्ये दिनांक ९ रोजी वृत्त प्रकाशित होताच संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच दखल घेत सदर बस फेरी पूर्ववत दिनांक १५ तारखे पासून सुरू केले असल्याचे वाहतूक अधिक्षक खोटरे मॅडम यांनी सांगितले.बस फेरी सुरू केल्यामुळे, जनतेनी समाधान व्यक्त केले आहे.

# विद्या मंदिर कन्या शाळेत एचपीव्ही लसीकरण जनजागृती कार्यक्रम

वि. प्रतिनिधी १६ जुलै



**अकोला :** जिल्हा स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापूराव पवार यांच्या मार्गदर्शनात विद्या मंदिर कन्या शाळा येथे १५ जुलै रोजी विद्यार्थिनी, पालक व शिक्षकांसाठी एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संगीता जाधव, समाजसेवा अधीक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय तसेच सौ. ज्योती गवई, सुरक्षा क्लिनिक समुपदेशक यांनी उपस्थित पालक, शिक्षक व विद्यार्थिनींना एचपीव्ही विषाणू, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग, त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय आणि एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास पालक, शिक्षक आणि विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थिनींनी आरोग्यविषयक प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. शिक्षकांनीही विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदविला.

डॉ. बापूराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हा उपक्रम गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी प्रभावी ठरणार असून, एचपीव्ही लसीकरणाबाबत समाजात सकारात्मक जनजागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्या मंदिर कन्या शाळेच्या प्राचार्या सौ. माधुरी ठाकूर यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल व सकारात्मक प्रतिसादाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

## पावसाची प्रतीक्षा पाऊस थांबल्यामुळे

**अकोला :** पाऊस थांबल्यामुळे विविध प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. शेतकरी तसेच सर्वच जण पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत.

# कार्यकर्ता हा राष्ट्रनिर्माणाचा प्रभावी शिल्पकार – शैलेश जोशी

## विद्या भारती परिचय वर्ग संपन्न

प्रतिनिधी १६ जुलै




**अकोला :** "भारतीय संस्कृती, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जपणूक करणारे शिक्षण हीच काळाची गरज आहे. विद्या भारतीचे कार्य हे केवळ शाळा चालविण्यापुरते मर्यादित नसून सुसंस्कारित, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविण्याचा व्यापक समाज प्रबोधनाचा उपक्रम आहे," विद्या भारतीचा इतिहास, ध्येय, कार्यपद्धती, वैशिष्ट्ये आणि भारतीय शिक्षण परंपरेची वैशिष्ट्ये यांचे सविस्तर विवेचन केले. भारतीय मूल्यांवर आधारित शिक्षणातून सामाजिक समरसता, राष्ट्रीय एकात्मता आणि चारित्र्यनिर्मिती घडते, असे त्यांनी सांगितले. प्रत्येक शिक्षक, पालक आणि कार्यकर्ता हा राष्ट्रनिर्माणाचा प्रभावी शिल्पकार असून समाजपरिवर्तनासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याचे आवाहन विद्या भारती विदर्भ व देवगिरी प्रांताचे संघटन मंत्री शैलेश जोशी यांनी केले. विद्या भारती परिचय वर्ग बुधवार दि. 15 जुलै रोजी मदनलाल खंडेलवाल सभागृह, गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला येथे संपन्न झाला. विद्या भारती विदर्भ अंतर्गत अकोला जिल्ह्याच्या वतीने आयोजित 'विद्या भारती परिचय वर्ग' उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती वंदनेने झाली. यावेळी सचिन जोशी अध्यक्ष, विदर्भ प्रांत, विठ्ठलराव खारोडे अध्यक्ष, विद्या भारती अकोला जिल्हा आणि मंगेश वानखडे अध्यक्ष, विद्या भारती अकोला महानगर उपस्थित होते.

प्रास्ताविकात अकोला जिल्हा मंत्री गिरीश कानडे यांनी केले. सहमंत्री डॉ. विक्रम जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सचिन जोशी यांनी विद्या भारती अकोला जिल्हा व अकोला महानगरच्या नवनियुक्त कार्यकारिणीची घोषणा केली. गटनिहाय दुसऱ्या सत्रामध्ये संघटन मंत्री शैलेश जोशी यांनी नवनियुक्त कार्यकारिणी सदस्यांसाठी 'दायित्व बोध' या विषयावर कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या, संघटन कौशल्य, कार्यसंस्कृती आणि आचारपद्धती याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दुसऱ्या गटात प्रांत सहमंत्री समीर थोडगे व सचिन जोशी यांनी 'विद्या भारतीच्या कार्यात शिक्षकांची भूमिका' या विषयावर शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन विद्या भारती अकोला महानगरचे मंत्री योगेश मल्लेकर यांनी केले.

प्रथम गटात विठ्ठल खारोडे तर द्वितीय गटाचा मंगेश वानखडे यांनी आभार प्रदर्शन करून शांतिमंत्राने वर्ग संपन्न झाला.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर 1 ऑगस्टला

प्रतिनिधी १६ जुलै



**मूर्तिजापूर :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार गतिमान प्रशासन व आपत्कालीन व्यवस्थेच्या बळकटीकरणाच्या उद्देशाने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' अंतर्गत मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषद, मूर्तिजापूर येथील हॉल क्रमांक २ व ३ मध्ये होणार आहे.

उपविभागीय अधिकारी कार्यालय, मूर्तिजापूर यांच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार, या शिबिराचा लाभ मूर्तिजापूर व बार्शिटाकळी तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि लाभार्थींना मिळणार आहे. शासनाच्या विविध महसूल व कल्याणकारी योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या अभियानाचा उद्देश आहे.

### शिबिरात मिळणारे प्रमुख लाभ

महिलांना शेतकरी दर्जा देण्यासाठी प्रमाणपत्रांचे वितरण, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेबाबत कार्यवाही, शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया, तुकडेबंदी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक क्षेत्र घोषणा, 'जिवंत सातबारा' मोहिमेअंतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, सिंधी विस्थापितांच्या निवासी व व्यावसायिक जमिनी फ्रीहोल्ड करण्यासाठी विशेष अभय योजनेचा लाभ, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांसाठी विशेष तरतुदी, कुंभार समाजातील पारंपरिक व्यवसायासाठी विविध सवलती, शेतजमिनीच्या कौटुंबिक वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ करण्यासंदर्भातील कार्यवाही, याशिवाय, विविध शासकीय विभागांच्या इतर योजनांचाही लाभ नागरिकांना शिबिरस्थळी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महसूल प्रशासनाने मूर्तिजापूर व बार्शिटाकळी तालुक्यातील सर्व शेतकरी व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरात उपस्थित राहून महसूल विषयक प्रलंबित कामे मार्गी लावून घ्यावीत, असे आवाहन केले आहे. हे शिबिर नागरिकांना एकाच ठिकाणी अनेक शासकीय सेवांचा लाभ मिळवून देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. अशी माहिती उपविभागीय अधिकारी संदीप कुमार आपार व तहसीलदार शिल्पाताई बोबडे यांनी पत्रकार परिषदेत दिली

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# जि.प. बांधकाम विभागाचा शाखा अभियंता एसीबीच्या जाळ्यात

## १० हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

प्रतिनिधी १६ जुलै

**यवतमाळ** : जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग क्र. १ मधील शाखा अभियंता मधुसूदन ताजणे यांना १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने बुधवारी रंगेहाथ पकडले.

तक्रारदार हे शासकीय ठेकेदार असून त्यांना जिल्हा परिषद प्रशासकीय इमारत परिसरातील पार्किंग शेड बांधकाम व पार्किंग व्यवस्थेची दोन कामे ऑनलाईन निविदेद्वारे मिळाली होती. या कामांचे अंतिम देयक मंजूर करण्यासाठी तसेच मोजमाप पुस्तिकेवर (एम.बी.) स्वाक्षरी करून पूर्णत्व प्रमाणपत्र (सीसी) देण्यासाठी शाखा अभियंता मधुसूदन ताजणे यांनी २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याची तक्रार एसीबीकडे करण्यात आली होती.



तक्रारीची पडताळणी केल्यानंतर तडजोडीअंती १० हजार रुपये स्वीकारण्याचे निश्चित झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार बुधवारी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग क्र. १ च्या कार्यालयात सापळा रचण्यात आला. यावेळी तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ताजणे यांना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ अटक केली.

या प्रकरणी यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या पर्यवेक्षणात पोलीस निरीक्षक मनोज ओरके, पोलीस निरीक्षक अर्जुन घनवट तसेच एसीबीच्या पथकाने केली.

### लाच मागितल्यास एसीबीशी संपर्क साधा

- कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तातडीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीने केले आहे. तक्रारदारांची ओळख गोपनीय ठेवून तातडीने कारवाई केली जाईल, असेही विभागाने स्पष्ट केले आहे.

# घाटोडी एमआयडीसीतील खुनाचा उलगडा

## एकाला अटक, विधीसंघर्षित बालक ताब्यात

प्रतिनिधी १६ जुलै

**पुसद** : घाटोडी औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) परिसरातील एका पडीत इमारतीच्या जिन्यावरील स्लॅबवर कुजलेल्या अवस्थेत आढळलेल्या ३५ वर्षीय संतोष अजबराव जाधव (रा. मधुकरनगर, पुसद) यांच्या खुनाचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखा व पुसद ग्रामीण पोलिसांनी अवघ्या काही तासांत केला.

तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी एका विधीसंघर्षित बालकास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने साथीदार श्याम अशोक राठोड (वय १९, रा. अश्वीनपूर) याच्यासह संतोष जाधव यांना मोटारसायकल विकून पैसे मिळविण्याच्या उद्देशाने एमआयडीसीत बोलावून शेल्याने गळा आवळून खून केल्याची कबुली दिली. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी



मृतदेह पडीत इमारतीच्या जिन्यावरील स्लॅबवर टाकल्याचेही निष्पन्न झाले.

या प्रकरणी पुसद ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून श्याम राठोड याला अटक करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे व पुसद ग्रामीणचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# जोडमोहा परिसरात पिके वाचविण्यासाठी सिंचन

प्रतिनिधी १६ जुलै

**जोडमोहा** : मागील आठ-दहा दिवसांपासून पाऊस नसल्याने परिसरातील पिके धोक्यात आली आहे. एकीकडे पाऊस नाही, तर दुसरीकडे पावसाचा थेंबही नसल्याने कपाशी, सोयाबीन, तूर ही पिके कोमेजू लागली आहे. त्यामुळे या परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांनी आर्द्रा नक्षत्राच्या उत्तरार्धात पेरलेले बियाणे उगवले.

मात्र, पावसाने दडी मारल्यामुळे पिके कोमेजू लागली आहे. पाण्याची सोय असलेल्या शेतकऱ्यांनी पिके वाचविण्यासाठी सिंचन करणे सुरू केले आहे. रोपं वाळल्यास शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे.

# हवामान बदलाचा परिणाम; उमरखेड उपजिल्हा रुग्णालय 'हाऊसफुल'

## औषध व मनुष्यबळाच्या कमतरतेने रुग्ण हैराण



प्रतिनिधी १६ जुलै

**उमरखेड** : गेल्या काही दिवसांतील हवामानातील बदलामुळे उमरखेड तालुक्यात सर्दी, ताप, खोकला, अंगदुखी, डायरिया आदी आजारांचे प्रमाण वाढले असून त्याचा मोठा ताण उपजिल्हा रुग्णालयावर आला आहे. वाढत्या रुग्णसंख्येमुळे रुग्णालयातील वॉर्ड भरून गेले असून उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असल्याची तक्रार आहे.

उमरखेड शहरासह तालुक्यातील ९२ ग्रामपंचायती आणि महागाव तालुक्यातील अनेक रुग्ण या उपजिल्हा रुग्णालयावर अवलंबून आहेत. मात्र आवश्यक वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांची कमतरता असल्याने रुग्णसेवेवर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. औषधांचा तुटवडाही कायम असल्याचा आरोप करण्यात येत आहे. स्थानिक संघटना आणि नागरिकांनी यापूर्वीही निवेदने व आंदोलने करून रुग्णालयातील समस्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत. तरीही आवश्यक सुविधा उपलब्ध न झाल्याने अनेक किरकोळ आजारांच्या रुग्णांनाही यवतमाळ किंवा नांदेड येथे रेफर केले जात असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. त्यामुळे रुग्णांचा वेळ आणि आर्थिक खर्च वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### नवजात शिशूंसाठी एनआयसीयू सुविधा बंद

- उपजिल्हा रुग्णालयातील एनआयसीयू (NICU) विभाग कार्यरत नसल्याने नवजात शिशूंना उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलवावे लागत असल्याचा आरोप प्रहार संघटनेचे शाम चेके यांनी केला. त्यामुळे पालकांवर आर्थिक भार पडत असून एनआयसीयू विभाग तातडीने सुरू करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

### औषधसाठा व रिक्त पदे तातडीने भरावीत

- वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची तातडीने भरती करावी, औषधांचा तुटवडा दूर करून आवश्यक औषधांचा पुरवठा करावा, अशी मागणी शिवसेना (एकनाथ शिंदे) शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी केली. मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# कृषी निविष्ठांवर प्रशासनाचा दणका; १५१ केंद्रांची विक्री बंद, ३८ परवाने निलंबित

## १५ परवाने कायमस्वरूपी रद्द; आठ प्रकरणांत गुन्हे दाखल

प्रतिनिधी १६ जुलै

**यवतमाळ** : जिल्ह्यात निकृष्ट कृषी निविष्ठांवर प्रशासनाने मोठी कारवाई करत १५१ कृषी केंद्रांना विक्री बंदचे आदेश दिले आहेत. याशिवाय ३८ कृषी केंद्रांचे परवाने निलंबित, तर १५ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत. तसेच आठ प्रकरणांमध्ये पोलिसांकडे गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीबाबत वाढलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या



जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समितीच्या बैठकीत ही माहिती देण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी निकृष्ट बियाण्यांसाठी संबंधित कंपन्यांनाच जबाबदार धरून तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचे निर्देश दिले.

जिल्ह्यात १४ जुलै २०२६ पर्यंत एकूण ४,०९० कृषी निविष्ठा दुकानांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात आली. दरम्यान, सोयाबीन बियाण्यांच्या उगवणीबाबत जिल्ह्यात ८३२ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४८५ तक्रारींची प्रत्यक्ष पाहणी पूर्ण झाली आहे. उर्वरित तक्रारींची तपासणी सुरू असून संबंधित कंपन्यांच्या बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. नमुने अप्रमाणित आढळल्यास संबंधित कंपन्यांविरुद्ध न्यायालयीन कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी स्पष्ट केले.

बैठकीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, कृषी विकास अधिकारी लहू आडे, मोहीम अधिकारी प्रवीण जाधव, जिल्हा गुणनियंत्रण अधिकारी धीरज मोहेकर, कृषी विक्रेते आणि विविध बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# दोन जुगार अड्डे उद्ध्वस्त, रेतीचा ट्रॅक्टर जप्त

## तीन कारवायांत साडेसहा लाखाचा मुद्देमाल जप्त; ११ जणांवर गुन्हे

प्रतिनिधी १६ जुलै

**महागाव** : अवैध धंद्यांविरोधात महागाव पोलिसांनी धडक मोहीम राबवत दोन जुगार अड्ड्यांवर छापे टाकले, तर धनोडा येथे विनापरवाना रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त केला. सलग तीन कारवायांमधून सुमारे ६.७१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

खडका फाटा परिसरातील जंगलात सुरू असलेल्या ५२ पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून अमोल बाबूसिंग राठोड, विजय माणिक मोरे, उमेश कैलास भोयर, रवी भिमराव मुनेश्वर आणि विजय केशवराव राऊत या पाच जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा १ लाख ३६ हजार ७६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




यानंतर मुडाणा गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ लगत हॉटेलच्या पाठीमागील नाल्यात सुरू असलेल्या दुसऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. सय्यद फिरोज सय्यद इसाक, बंडू गणपत कुराडे, विनोद जयवंत चव्हाण, दिगंबर साहेबराव कुंभार, समाधान दिगंबर वानखेडे आणि लोचन मनोज राऊत यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. या ठिकाणाहून २८ हजार ७३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, धनोडा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील पुलाजवळ विनापरवाना रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी ट्रॅक्टर अडवून कारवाई केली. पंचांसमक्ष ट्रॅक्टर व एक ब्रास रेती असा ५ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक सेवानंद वानखेडे व महागाव पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली.

# पीक विमा प्रकरणी मंत्रालयात आमदार किसनराव वानखेडे आक्रमक

## १० दिवसांत सुधारित अहवाल पाठविण्याचे निर्देश

प्रतिनिधी १६ जुलै

**उमरखेड** : यवतमाळ जिल्ह्यातील, विशेषतः उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पीक विम्यापासून वंचित राहावे लागल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार किसनराव वानखेडे यांनी बुधवारी मंत्रालयात आक्रमक भूमिका घेतली. कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत चुकीचा पीक विमा अहवाल तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

आमदार वानखेडे यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानीचा योग्य अभ्यास न करता तयार करण्यात आलेल्या अहवालामुळे हजारो शेतकरी



विमा लाभापासून वंचित राहिल्याचा आरोप केला. चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनासह कायदेशीर कारवाई करण्याची मागणी त्यांनी बैठकीत लावून धरली.

बैठकीनंतर कृषीमंत्री दत्तामामा भरणे यांनी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांना 'उंबरठा उत्पन्नाचा' सुधारित अहवाल १० दिवसांच्या आत केंद्र सरकारकडे पाठविण्याचे कडक निर्देश दिले.

आमदार किसनराव वानखेडे व भाजपचे यवतमाळ-पुसद जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या पुढाकाराने झालेल्या या बैठकीला कृषी विभागाचे प्रधान सचिव, कृषी आयुक्त, कृषी संचालक, यवतमाळचे जिल्हाधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) तसेच जिल्हा कृषी अधीक्षक उपस्थित होते.

"निसर्गाच्या संकटाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा पीक विमा नाकारणे हा अन्याय आहे. चुकीच्या अहवालामुळे शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालू नये," असे आमदार वानखेडे यांनी बैठकीत स्पष्टपणे सांगितले.

या बैठकीनंतर उमरखेड व महागाव तालुक्यातील पीक विम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# राष्ट्रीय महामार्गाची दुरवस्था; खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला

## नवीन रस्त्याला मंजुरी, मात्र राजकीय उदासीनतेमुळे काम रखडले

प्रतिनिधी १६ जुलै

**उमरखेड** : उमरखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे हा मार्ग अपघातांना निमंत्रण देत असल्याचे चित्र आहे. विशेषतः जगदंबा देवी कमानीजवळील रस्त्यावरील खड्डे वाहनचालक, पादचारी आणि दुचाकीस्वारांसाठी जीवघेणे ठरत आहेत. पावसाळ्याच्या तोंडावरही रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दररोज हजारो लहान-मोठी वाहने या महामार्गावरून प्रवास करतात. मात्र, खड्डे चुकविताना



वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. दुचाकीस्वार, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत असून अनेक किरकोळ अपघातही घडत आहेत. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. महागाव रोडवरील बायपासपासून शहरातील मुख्य मार्गाने नांदेड बायपासपर्यंत अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे. विशेषतः जगदंबा देवी कमानीजवळील खड्डे वर्षानुवर्षे कायम असून दिवसेंदिवस त्यांची तीव्रता वाढत आहे. पावसाचे पाणी साचल्याने खड्ड्यांची खोली लक्षात न आल्यामुळे रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. या महामार्गाचे सिमेंट काँक्रीट रस्त्यात रूपांतर करून भूमिगत जलनिस्सारण व्यवस्था उभारण्यास मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले होते. जानेवारीपासून काम सुरू होईल, अशी घोषणाही करण्यात आली होती. मात्र, राजकीय उदासीनतेमुळे अद्याप कामाला सुरुवात झालेली नाही. दरम्यान, रस्त्यांची डागडुजी व खड्डे बुजविण्याची जबाबदारी असलेल्या ठेकेदाराकडूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाकडून केवळ पाहणी आणि आश्वासनांवरच वेळ मारून नेली जात असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवालही उपस्थित केला जात आहे.महामार्गाच्या दुरवस्थेमुळे प्रवासी, व्यापारी आणि वाहतूकदारांनाही आर्थिक फटका बसत आहे. तातडीने खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त करण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# माथार्जून आश्रमशाळेत मोफत आरोग्य शिबिर

## विद्यार्थी, बालके व गरोदर मातांची तपासणी

प्रतिनिधी १६ जुलै

**झरी-जामणी** : शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, माथार्जून येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, झरी आणि सत्यसाई हॉस्पिटल, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात विद्यार्थी, बालके आणि गरोदर मातांची विविध आजारांसाठी तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहन गेडाम, वैद्यकीय अधिकारी डॉ. जीवन कुडमते, डॉ. खडसे, डॉ. फाल्गुनी, आरोग्य सहायक श्री. सोनोने व परिचारिका कु. रेश्मा गोंडे यांनी शिबिरात सेवा दिली. तसेच




सत्यसाई हॉस्पिटल, यवतमाळ येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सिसोदिया, बालरोगतज्ज्ञ डॉ. धात्रक यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनीही तपासणी केली.

शिबिरात विद्यार्थ्यांची सिकल सेल, थॅलेसेमिया, ईसीजी, स्कॅनसह विविध वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. परिसरातील ० ते १५ वर्षे वयोगटातील बालके आणि गरोदर मातांचीही सखोल तपासणी करून आवश्यक उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक अविनाश मोरे, परिचारिका कल्याणी ताजने, शिक्षक मडावी, नागोसे, कुडमते, येंचलवार, कुमरे, नाज, सुप्रिया तसेच कर्मचारी काशिनाथ व मारोती उपस्थित होते.

शिबिरामुळे दुर्गम भागातील विद्यार्थी, बालके आणि गरोदर मातांना त्यांच्या परिसरातच तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सेवा उपलब्ध झाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर व ‘अमृत’ संस्थेमध्ये सामंजस्य करार

प्रतिनिधी १६ जुलै



## नवउद्योजकांचे स्वप्न होणार साकार

**अमरावती:** तरुण उद्योजकांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना बळ देण्यासाठी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ‘एसजीबीएयू रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन’ व महाराष्ट्र शासनाच्या ‘अमृत’ संस्था, पुणे यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत अमृत संस्था आणि इन्क्युबेशन सेंटर यांच्या माध्यमातून इन्क्युबेशन योजना’ राबवली जाणार असून, याद्वारे राज्यातील शंभर नवसंशोधकांची , तर सुरवातीला एकूण 25 नवसंशोधकांची निवड केली जाईल. निवड झालेल्या प्रत्येक स्टार्टअपला ‘अमृत’ संस्थेकडून एक वर्षासाठी दरमहा पंचवीस हजार रुपये मासिक फेलोशिप/ सीड फंडिंग दिले जाईल. तसेच विद्यापीठाच्या इंक्युबेशन सेंटरतर्फे या तरुणांना अत्याधुनिक प्रयोगशाळा, कार्यशाळा, हक्काची जागा तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन पुरवले जाईल.

कृषी तंत्रज्ञान, बायोटेक, ईव्ही आणि आयओटी यांसारख्या आधुनिक क्षेत्रातील स्टार्टअप्सना या योजनेमुळे मोठी गती मिळणार असून, पुढील तीन वर्षे हा उपक्रम अविरत राहणार आहे.

सदर करार करते वेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटर च्या प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, सीईओ श्री. आनंद यादव, श्री. अमोल हिरुळकर, ‘अमृत’ संस्थेचे विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेश हरिश कथलकर आदि मान्यवर उपस्थित होते.

# प्राणघातक शस्त्र जवळ बाळगूण इन्स्टाग्रामवर फोटा व्हायरल करणाऱ्या आरोपीतांना ताब्यात

प्रतिनिधी १६ जुलै

## राजापेठ पोलिसांची कारवाई



**अमरावती :** प्राणघातक शस्त्र जवळ बाळगुण इन्स्टाग्रामवर फोटा व्हायरल करणा-या आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई राजापेठ पोलिसांनी केली.

सदर प्रकरणाची हकीकत अशा प्रकारे आहे की, पोलीस स्टेशन राजापेठचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना इन्स्टाग्रामवर दोन इसम चाकु सारखे प्राणघातक शस्त्र बाळगुन फोटो इन्स्टाग्राम, सोशल मिडीयावर व्हायरल होत असल्याची माहीती मिळताच त्यांनी राजापेठ डि.बी ला आदेश देवुन ताबडतोब व्हायरल फोटोमधील इसमाला पकडुन कार्यवाही बाबत आदेश दिल्याने राजापेठ डि. बी. चे प्रमुख सपोनी नितीन शिंदे व सोबत पो स्टॉफ हे दि. 15 जुलै चे 9 वा. पासुन गस्तीवर असताना व इन्स्टाग्रामवर प्राणघातक शस्त्र घेवुन तो फोटा व्हायरल करणा-या इसमांवर कार्यवाही करीत असतांना दोन इसम प्राणघातक शस्त्र घेवुन कोल्हटकर कॉलनी, अमरावती येथुन जात आहे. अशा मिळालेल्या बातमीच्या आधारे हिंदु स्मशान भुमीच्या भिंती लगत, कोल्हटकर कॉलनी, अमरावती येथे पो. स्टॉफ व पंचां समक्ष आरोपी रितीक राजु डोंगरे, वय 21 वर्षे, रा. गांधी आश्रम, गल्ली नं 2, अमरावती, पवन गोपाल कांबळे, वय 18 वर्षे, रा. हनुमान मंदीरा जवळ, महाजन पुरा अमरावती यांना ताब्यात घेण्यात आले.

नमुद आरोपी कमांक 1 याचे कडुन एक चायना चाकु ज्याची एकुण लांबी 11 ईच. पात्याची लांबी 06 इंच व मुठची लांबी 5 इच, पात्याची रूंदी 3 इंच कि अं 500 असलेला तसेच आरोपी कमांक 02) हयाचे कडुन एक चायना चाकु ज्याची एकुण लांबी 11 ईच. पात्याची लांबी 06 इंच व मुठची लांबी 5 इच, पात्याची रूंदी 3 इंच कि अं 500 असलेला असा एकुण 1000 रूचा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि- 2 अमरावती संजय खटाळे, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, संदीप चव्हाण, सपोनी नितीन शिंदे, पोहेकॉ मनीश करपे, पोहेकॉ पवन तिवारी, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोहेकॉ शशी शेळके, पोकॉ अंकुश काळे, पोकॉ मंगेश कपीले, पोकॉ अमोल खंडेजोड, पोकॉ आकाश यादव, पोकॉ रफीक खान, पोकॉ यश ओगले, यांनी केली.

# ऐतिहासिक निर्णय : अमरावती महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी साजरा होणार

## सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे यांचा ठराव सर्वानुमते मंजूर

प्रतिनिधी १६ जुलै

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासात आज एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय नोंदविण्यात आला. महानगरपालिकेचा वर्धापन दिन दरवर्षी अधिकृतरीत्या साजरा करण्यात यावा, हा सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे यांनी मांडलेला ठराव अमरावती महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव मांडताना गावंडे यांनी सांगितले की, अमरावती महानगरपालिका ही शहराच्या विकासाची प्रमुख संस्था असून, तिच्या स्थापनेपासून अनेक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. या गौरवशाली प्रवासाचे स्मरण राहावे, नागरिकांमध्ये शहराबद्दल अभिमानाची भावना निर्माण व्हावी आणि महानगरपालिकेचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने वर्धापन दिन साजरा करणे आवश्यक आहे.

यावेळी त्यांनी वर्धापन दिनानिमित्त विविध विकासकामांचे लोकार्पण, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी व उत्कृष्ट कर्मचारी सन्मान, माजी महापौर व माजी नगरसेवकांचा गौरव, तसेच शहराच्या इतिहासावर आधारित प्रदर्शने व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याची सूचना केली.

या ठरावाला सभागृहातील सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त पाठिंबा दिला. सकारात्मक चर्चेनंतर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. ठराव मंजूर झाल्यानंतर प्रतिक्रिया देताना सभागृह नेता तथा माजी महापौर चेतन गावंडे म्हणाले, "अमरावती महानगरपालिकेचा वर्धापन दिन हा केवळ उत्सव नसून शहराच्या विकासाचा इतिहास, लोकशाही मूल्ये आणि नागरिकांच्या सहभागाचा गौरव करणारा दिवस आहे. हा निर्णय शहराच्या अस्मितेला बळ देणारा असून, भविष्यात वर्धापन दिन लोकसहभागातून मोठ्या उत्साहात साजरा केला जाईल."

या ऐतिहासिक निर्णयाचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, अमरावती महानगरपालिकेच्या इतिहासात हा निर्णय मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनासाठी शंभर टक्के अनुदान

प्रतिनिधी १६ जुलै

## कृषी विभागाचे अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती :** राष्ट्रीय कृषी विकास योजना (प्रति थेंब अधिक पीक) अंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी ठिबक व तुषार सिंचन संच खरेदी करण्यासाठी शासनामार्फत संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. विविध शासकीय योजनांच्या समन्वयातून या प्रवर्गातील शेतकऱ्यांना आता तब्बल शंभर टक्के अनुदान मिळणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश पाणीबचत करून पिकांची उत्पादकता वाढवणे आणि वंचित घटकांतील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा आहे.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना 55 टक्के, तर इतर शेतकऱ्यांना 45 टक्के अनुदान दिले जाते.

यामध्ये आणखी भर घालत मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून अल्प व अत्यल्प भूधारकांना 25 टक्के आणि इतर शेतकऱ्यांना 30 टक्के पूरक अनुदान मिळते. याशिवाय, उर्वरित रक्कम जिल्हा परिषदेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या माध्यमातून (अल्प व अत्यल्प भूधारकांसाठी 10 टक्के आणि इतरांसाठी 15 टक्के) पूरक अनुदान असे एकूण 90 टक्के म्हणून दिली जाते. यामुळे शेतकऱ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नसून त्यांना एकूण 100 टक्के अनुदान प्राप्त होईल.

या शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतकऱ्यांकडे स्वतःच्या मालकी हक्काचा चालू 7/12 उतारा, 8-अ उतारा असणे तसेच शेतात ओलीताची (पाण्याची) शाश्वत सोय असणे बंधनकारक आहे. पात्र व गरजू शेतकऱ्यांनी शासनाच्या अधिकृत महाडीबीटी पोर्टलवर (mahadbt.maharashtra.gov.in) जाऊन ऑनलाईन पद्धतीने त्वरित अर्ज सादर करावेत. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन आपले शेती उत्पादन वाढवावे, असे आवाहन अमरावतीच्या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

# ‘मिशन लक्षवेध’ अंतर्गत आर्चरी व बॅडमिंटन खेळाडूंसाठी सुवर्णसंधी

## 21 व 22 जुलै रोजी निवड चाचणी

**अमरावती:** ऑलिम्पिक स्तरावर महाराष्ट्राचे नाव क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल करण्यासाठी राज्य शासनामार्फत 'मिशन लक्षवेध' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र' सुरू करण्यात येत असून, आर्चरी (तिरंदाजी) आणि बॅडमिंटन या दोन खेळांसाठी प्रत्येकी 20 गुणवंत खेळाडूंची निवड केली जाणार आहे. या विशेष अनिवासी प्रशिक्षणासाठी पात्र खेळाडूंची निवड चाचणी 21 आणि 22 जुलै 2026 रोजी अमरावतीत आयोजित करण्यात आली आहे.

या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे निवड झालेल्या खेळाडूंचा पूरक आहार, गणवेश, क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा प्रवास खर्च, प्रशिक्षक आणि वैद्यकीय विम्यासह सर्व खर्च शासनामार्फत केला जाईल. या चाचणीत सहभागी होण्यासाठी खेळाडूचे वय 21 वर्षांखालील असावे आणि त्याने शालेय किंवा अधिकृत संघटनेच्या क्रीडा स्पर्धांमध्ये किमान राज्य स्तरावर सहभाग किंवा पदक मिळवलेले असावे. इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज जन्म दाखला, क्रीडा कामगिरीच्या प्रमाणपत्रांसह 20 जुलै 2026 पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती येथे प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक आहे.

# राजापेठ-अंबादेवी मंदिर रस्ता 16 जुलैपासून वाहतुकीसाठी बंद

## सौंदर्यीकरण आणि प्रवेशद्वाराच्या बांधकामामुळे प्रशासनाचा निर्णय

प्रतिनिधी १६ जुलै

**अमरावती :** शहरातील राजापेठ परिसरातील अंबादेवी मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील वाहतूक व्यवस्था 16 जुलै ते 3 ऑगस्ट 2026 या कालावधीत पूर्णपणे बंद राहणार आहे. या भागातील ‘एच अँड एफ’ (H&F) शोरूमसमोर भव्य प्रवेशद्वाराचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. पुढील टप्प्यातील सौंदर्यीकरणाचे काम सुरू असताना कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होऊ नये, या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता वाहतुकीसाठी तात्पुरता बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने पर्यायी मार्ग जाहीर केले आहेत.

या कालावधीत अंबादेवी मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांसाठी व नागरिकांसाठी दोन मुख्य पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार, नवाथे नगरकडून गांधी चौकाकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहनधारकांनी ‘कुशल ऑटो’कडून भूतेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा. तसेच, कंवर नगर परिसराकडून येणाऱ्या नागरिकांनी ‘मोनालिसा कॉम्प्लेक्स’ जवळील रस्त्याचा वापर करावा. या पर्यायी मार्गांमुळे वाहतूक कोंडी टाळण्यास मदत होणार आहे.

हा वाहतूक बदल 3 ऑगस्ट 2026 पर्यंत लागू राहणार असून, या कालावधीत वाहनचालक, वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने घातलेल्या नियमांचे व निबंधांचे काटेकोरपणे पालन करावे. बांधकाम वेळेत व सुरक्षितपणे पूर्ण होण्यासाठी सर्व नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवाहन उपविभागीय अभियंता विनोद बोरसे यांनी केले आहे.

# स्वाधार योजनेच्या लाभार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहात अर्ज करणे बंधनकारक

## ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १६ जुलै

**अमरावती :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमांमध्ये समाज कल्याण विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता 11 वी, 12 वी तसेच सर्व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे अनिवार्य केले आहे.पात्र विद्यार्थ्यांनी आगामी 15जुलै2026पर्यंतमहाआयटीच्या अधिकृत संकेतस्थळावर (https://hmasnew.mahait.org) रितसर ऑनलाईन अर्ज नोंदवणे बंधनकारक राहील. शासनाच्या नव्या नियमांनुसार,ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केला आहे आणि केवळ गुणवत्तेनुसार अथवा शासकीय वसतिगृहात जागा उपलब्ध न झाल्यामुळे ज्यांना प्रवेश मिळाला नाही,असेचविद्यार्थीपुढीलटप्प्यात स्वाधार योजनेच्या आर्थिक लाभासाठी पात्र धरले जातील. चालू शैक्षणिक वर्षात जे विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज सादर करणार नाहीत, त्यांना स्वाधार योजना तसेच शासकीय वसतिगृह योजना या दोन्ही महत्त्वाच्या योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागेल. जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत आपली नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यांनी केले आहे. या योजनेच्या अटी,शर्ती व अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी ‘सामाजिक न्याय भवन, सहायक आयुक्त, समाज कल्याण, चांदूर रेल्वे रोड, सी.पी. ऑफिसच्या मागे, अमरावती’ येथे किंवा speld-swo_amt@rediffmail.com या ई-मेलवर अथवा 0721-2661261 या दूरध्वनी क्रमांकावर कार्यालयीनवेळेतसंपर्कसाधावा.

# आदिवासी सुशिक्षित तरुणांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाची संधी

प्रतिनिधी १६ जुलै

## विद्यावेतनासह मिळणार पुस्तक संच

**अमरावती :** जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी मोफत स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या अचलपूर येथील ‘आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र’ यांच्या वतीने विविध सरकारी स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी साडेतीन महिन्यांचे विशेष मोफत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण विनामूल्य असून प्रशिक्षणार्थी उमेदवारांना दरमहा 1 हजाररुपयेविद्यावेतनआणिमोफत अभ्यासिकेची सोय उपलब्ध करून दिलीजाणारआहे.तसेच,हेसाडेतीन महिन्यांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना पुढील अभ्यासासाठी पुस्तकांचा संचही मोफतदिलाजाणारआहे.

या प्रशिक्षण सत्राचा कालावधी 1 ऑगस्ट ते 15 नोव्हेंबर 2026 असा असेल. यासाठी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज 23 जुलै 2026, सायंकाळी 6 वाजेपर्यंत लालपूल जवळील जयस्तंभ रोड, अचलपूर कॅम्प, परतवाडा येथील कार्यालयात सादर करावे. प्रवेश अर्ज वाटप आज 15 जुलैपासून सुरू झाले आहे. या प्रवेशासाठी अनुसूचित जमाती प्रवर्गातील किमान10वीउत्तीर्णआणि18ते30 वर्षे वयोगटातील उमेदवार पात्र ठरतील. तसेच उमेदवाराचे नाव जिल्हा कौशल्य विकास रोजगार कार्यालयात नोंदणीकृत असणे अनिवार्यआहे.

अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांची मुलाखत 24 जुलै 2026 रोजी दुपारी 12 वाजता संबंधित कार्यालयात घेतली जाईल. मुलाखतीसाठी उमेदवारांनी स्वतःच्या खर्चाने सर्व मूळ कागदपत्रांसह (शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, 10 वीचे गुणपत्रक, पासपोर्ट फोटो, बँक पासबुक व रोजगार नोंदणी कार्ड) उपस्थित राहावे.निवडझालेल्याउमेदवारांची अंतिमयादीत्याचदिवशीसायंकाळी 6 वाजता कार्यालयीन फलकावर प्रसिद्धकेलीजाईल.

# फळपीक विमा योजनेत 81 हजार 523 अर्जांची नोंद

प्रतिनिधी १६ जुलै

## मृगबहार २०२६ ला शेतकऱ्यांकडून विक्रमी प्रतिसाद

**अमरावती :** पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत मृगबहार २०२६ साठी विमा नोंदणी २७ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली असून, या योजनेला राज्यातील शेतकऱ्यांचा विक्रमी प्रतिसाद मिळाला आहे. १४ जुलै २०२६ पर्यंत एकूण ८१ हजार ५२३ विमा अर्जांची नोंद झाली आहे. गतवर्षी मृगबहार २०२५ मध्ये ही संख्या ५२ हजार १२१ इतकी होती. यंदा त्यामध्ये २९ हजार ४०२ अर्जांची वाढ झाली असून, नोंदणीचे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत सुमारे १५६ टक्के झाले आहे, अशी माहिती संचालक (कृषी प्रक्रिया व नियोजन) विनयकुमार आवटे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

यंदाच्या मृगबहार हंगामात द्राक्ष, पेरू, लिंबू, सीताफळ, मोसंबी, संत्रा, डाळिंब आणि चिकू या पारंपरिक फळपिकांसोबत प्रथमच अंजीर आणि हळद या दोन नवीन पिकांचा योजनेत समावेश करण्यात आला आहे. या पिकांसाठी प्रती हेक्टर विमा संरक्षित रक्कम अनुक्रमे द्राक्ष पिकासाठी ३.८० लाख रुपये, पेरू पिकासाठी ७० हजार रुपये, लिंबूसाठी ८० हजार रुपये, सीताफळसाठी ७० हजार रुपये, मोसंबीसाठी १ लाख रुपये, संत्राकरिता १ लाख रुपये, डाळिंब करिता १.६० लाख रुपये, चिकूकरिता ७० हजार रुपये, अंजीर करिता १.६० लाख रुपये आणि हळद करिता १.८० लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. या रकमेच्या साधारण पाच टक्के दराने शेतकऱ्यांना विमा हप्ता भरावा लागतो.

अंजीर व सीताफळ या पिकांसाठी विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ असून, उर्वरित सर्व पिकांसाठी अर्ज करण्याची मुदत १४ जुलै २०२६ पर्यंत होती. पीकनिहाय नोंदणीमध्ये हळद पिकासाठी सर्वाधिक ४१ हजार ५९५ विमा अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याखालोखाल संत्र्यासाठी १० हजार २३७, तर डाळिंबासाठी ८ हजार ६३ अर्जांची नोंद झाली आहे.

जिल्हानिहाय सहभागामध्ये नांदेड जिल्हा १३ हजार ८७५ अर्जांसह अव्वल ठरला असून, परभणी येथे १२ हजार १६२, हिंगोली येथे ११ हजार ९१० आणि अहिल्यानगर येथे ११ हजार ३५ अर्ज दाखल झाले आहेत. विशेषतः हळद पिकाचा नव्याने समावेश झाल्यानंतर परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या योजनेला अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे.

अंजीर आणि सीताफळ उत्पादक शेतकरी ३१ जुलैपर्यंत अर्ज करू शकणार असून, बँकांमार्फत सादर होणाऱ्या अर्जांमुळे एकूण नोंदणीत आणखी वाढ होण्याची अपेक्षा आहे. योजनेतील सर्व अर्ज नॅशनल क्रॉप इन्शुरन्स पोर्टल (NCIP) या ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जात आहेत. विमा योजनेत सहभागी झालेल्या सर्व शेतकऱ्यांनी डिजिटल पीक सर्वेक्षण (Digital Crop Survey) वेळेत पूर्ण करणे आवश्यक असून, तसे न केल्यास विमा अर्ज अपात्र ठरू शकतो. अंजीर व सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांनीही योजनेचा सविस्तर अभ्यास करून मुदतीपूर्वी विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# फोकस

• अतिष देशमुख @ वाशीम •



• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

आकांक्षीत जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. तर अतिवृष्टीमुळे शेतीतील पिकेच नव्हे तर संपूर्ण नदी व नाल्याकाठची शेतीतील माती खरडून गेली. शेतीच नष्ट झाली. सुरूवातीला अतिवृष्टीच्या मदतीतून जिल्हा वगळला नंतर समाविष्ट केला. तरी सुध्दा अद्यापही बळीराजा मदतीच्या प्रतिक्षेतच आहे. नदी जोड प्रकल्पातून वाशीम जिल्ह्याला वगळले असून अद्यापही नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाला नाही. अमरावती विद्यापिठाचे उपकेंद्र वाशीमला व्हावे यासाठी ३० वर्षापासून सामाजिक संघटनेसह राजकारण्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचेही प्रयत्न असफल झाले. आता विद्यापीठ उपकेंद्र अकोलाला होणार असल्याचे जाहीर झाल्याने आपले लोकप्रतिनिधी किती निष्क्रीय आहे हे सिध्द झाले. शहरातून जाणारा अकोला - नांदेड रस्ता चौपदरी ऐवजी दुपदरीच होत आहे. जिल्ह्यात एमआयडीसी भकास झाली असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे. जिल्ह्यातील शहरासह ग्रामीण भागातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्याच नाहीत. त्यामुळे जिल्ह्याचा आकांक्षीत जिल्हा म्हणून असलेला कलंक पुसण्यासाठी आलेला निधीही भ्रष्टअधिकाऱ्यांमुळेच खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतच नाही. अर्थसंकल्प अधिवेशनातही जिल्ह्याला काहीच मिळाले नाही. लोकप्रतिनिधींनीही काहीच केले नाही .

# कधी मिळणार न्याय जिल्ह्यावर अन्याय !



- * रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी
- * भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर
- * अमरावती विद्यापिठ उपकेंद्राची लढाई व्यर्थ
- *नदीजोड प्रकल्पातून वाशीम जिल्हा वगळला



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

नेत्यांचे मागणी पत्र, अन् श्रेयवादाचे सत्र, आश्वासनच मात्र...

प्रकल्प नाही आले / विकासाचे झाले येले / पाटबंधारे मंडळ गेले

जिल्हा उपेक्षित, अधिवेशनात दुर्लक्षित कायम आकांक्षित !

*रस्ता चौपदरी नव्हे तर होतोय दुपदरी *जिल्हा नदी जोड मधून वगळला...

नितीन गडकरी साहेब, जिल्ह्यातील... लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना, नाही शरम, झाले बेशरम !

राजकारणी झाले व्यापारी, जनतेला केले भिकारी

आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. कारण अधिवेशनातही बैठक आणि चर्चा घेवून कोणताही ठोस निर्णय झाला नाही. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश नव्हता आता मुख्यमंत्री दुसऱ्या टप्प्यात वाशीम जिल्ह्याचा समावेश करण्याचे आश्वासन २८ नोव्हेंबरच्या सभेत दिले यावरून जिल्ह्याचा नदीजोड प्रकल्पात समावेश नव्हता हे सिध्द झाले आहेत. आताही अधिवेशनात बैठकीचे सत्र सुरू असून आकांक्षीत जिल्ह्याला फक्त बैठका व आश्वासनावरच ठेवले आहे. जिल्ह्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. विदर्भातील हिवाळी अधिवेशनात जिल्ह्याच्या विविध प्रश्नांवर चर्चा होवून निर्णय होतील अशी अपेक्षा होती. मात्र, अधिवेशनात जिल्ह्याला कोणताच मोठा फायदा झाला नाही. कुठल्या प्रकारचे ठोस निर्णय न झाल्याने आकांक्षीत जिल्ह्याला दुर्लक्षीत करत उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. आकांक्षीत जिल्हा म्हणून सर्वप्रथम वाशीम जिल्ह्याचा विकासाच्या दृष्टीने विचार व्हावा यासाठी जिल्ह्यातील नेत्यांनी पुढे येणे गरजेचे आहे. निव्वळ पत्र आणि आश्वासन देवून आशेवर ठेवणे म्हणूजेच जिल्हा वासियांची फसवणूक करणे आहे. आजपर्यंत कोणतेच मोठे प्रकल्प आले नाहीत. आले तर ते होवू दिले नाहीत. जे जिल्ह्यात आहे ते इतर जिल्ह्यात नेल्या जात आहे. रस्तेही भ्रष्टाचाराने खड्ड्यात गेले आहेत.



अनेक प्रकल्प रखडले... जिल्ह्याचा विकास खुंटला !

गडकरी साहेब, खरे अन् स्पष्ट बोललात

श्रेयवादाची लढाई लढा, अन् विकासाचा मार्ग काढा

अतिवृष्टीचा भ्रष्टाचार निवळला, अर्धा जिल्हा वगळला !

नुकसान झाले, सर्व पिके गेले, जीवनाचे येले, शेतकरी मेले..!

मुख्यमंत्री 'देवा' अजब तुझा न्याय, खऱ्यावर अन्याय

# जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर...

मागास जिल्हा म्हणून वाशीम जिल्ह्याची नोंद आहे. सिंचनाचा अनुशेष देखील मोठ्या प्रमाणात आहे. नविन मोठेएकही प्रकल्प जिल्हयात आला नाही. शिवाय प्रकल्प आणण्यासाठी एकाही लोकप्रतिनिधीनी पुढाकार घेतला नाही. यावर कळस म्हणजे सिंचन विभागाला भ्रष्टाचाराने बरबटले असतांना सरकारने जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय शेगाव येथे स्थलांतरित करून जिल्ह्यावर अन्याय केला आहे. याविरोधात जिल्ह्यातील आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी दिखावा म्हणुन तीव्र विरोध केला. तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे उद्घाटन संपन्न झाले. आता साप गेल्या नंतर काडया मारण्यात काय अर्थ अशी चर्चा होत आहे. खुदद नितिन गडकरींनीही जिल्हयातील अधिका-यांच्या लक्ष्मी दर्शनाच्या लालसेमुळे व लोकप्रतिनिधीच्या निष्कीये ते मुळे अनेक प्रकल्प रखडल्याचे एक दोन वेळा नव्हे तर तीन वेळा जाहिर सभेत म्हटले आहे.

जिल्ह्यातील पाणी टंचाई व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सन २००८ मध्ये



प्रकल्प नाही आले / विकासाचे झाले येले / पाटबंधारे मंडळ गेले

जिल्हयात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलांतर

* लोकप्रतिनिधीचे प्रयत्न निष्फळ * अखेर पाटबंधारे मंडळ कार्यालयाचे शेगांव येथे उदघाटन

नितीन गडकरींनीही व्यक्त केले होती नाराजी

अकोला येथील कार्यक्रमात / हिंगोली येथील कार्यक्रमात / वाशीम येथील कार्यक्रमात

वाशीम जिल्ह्यात मंडळ कार्यालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यामुळे सिंचन क्षमता वाढीस मदत झाली. परंतु महाराष्ट्र शासन जल संपदा विभागाने २३ ऑक्टोंबर रोजी शासन निर्णय काढून मंडळ कार्यालय स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला. ही बाब मागास आणि अकांक्षीत असलेल्या वाशीम जिल्ह्यासाठी अन्यायकारक असून आमदार, खासदार आजी माजी हे नेते पुढे आले. त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे वरिष्ठ स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे माध्यमांना सांगितले होते. त्यांचे प्रयत्न व्यर्थ गेले. तरी देखील जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव येथे स्थलांतरित करण्यात आले. २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. यामुळे सरकार विरोधात जिल्ह्यात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कार्यालय स्थलांतर होत असतांना निव्वळ दिखावा म्हणुन मागणी करतांना लोकप्रतिनिधी पुढाकार घेतात. मात्र जिल्हयात नविन मोठे प्रकल्प आणुन विकासाचा मार्ग काढतांना दिसत नाही. तर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीसह सामाजिक संघटनाही तात्पूर्ते आंदोलन करून विरोध दर्शविला. मात्र, त्यामधून काही मार्ग निघाला नाही.

# सिंचनाचा भ्रष्टाचार निवळला, नदीजोड प्रकल्पातून जिल्हा वगळला...



प्रकल्प नाही आले / विकासाचे झाले येले / पाटबंधारे मंडळ गेले

पाटबंधारे विभागाचा भ्रष्टाचार निवळला, जिल्हा नदीजोड प्रकल्पातून वगळला

*अधिकारी भ्रष्टाचार सक्रीय *जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी निष्क्रीय

जिल्ह्यात भ्रष्टाचार निरंतर, पाटबंधारे मंडळाचे स्थलानंतर !

आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असलेल्या वाशिम जिल्ह्याच्या पदरी पुन्हा एकदा निराशाच आली असून वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पातून वाशिम जिल्हा वगळण्यात आला आहे. त्यामुळे सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शेतकऱ्यांची आशा मावळली आहे. नदी जोड प्रकल्पात जिल्ह्याचा समावेश झाल्याचे पोस्टर लावून चमकोगिरी करणारे नेते मात्र आता तोंडघशी पडले असून जिल्ह्यातील राजकारण्यांची निष्क्रियता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. विदर्भातील वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प हा राज्यस्तरीय नदीजोड प्रकल्प प्रस्तावित असून या प्रकल्पाव्दारे वैनगंगा नदीवरील भंडारा जिल्हयातील गोसीखुर्द



प्रकल्पात पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी वैनगंगा उपखोऱ्यातून पुर्णा-तापी खोऱ्यातील बुलढाणा जिल्हयातील नळगंगा प्रकल्पापर्यंत नदीजोड कालव्याद्वारे वळविणे प्रस्तावित आहे. या कालव्याव्दारे विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा ह्या सहा जिल्ह्यातील १५ तालुक्यातल्या एकूण ३७१२७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पाची जलसंपदा विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार प्रकल्पाची किंमत रु.८८,५७५ कोटी इतकी आहे. पूर्वी या प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचाही समावेश होता मात्र, ६ फेब्रुवारी रोजी राज्य सरकारने काढलेल्या शासन निर्णयात वाशिम जिल्ह्याचा उल्लेख नाही. त्यामुळे आकांक्षीत जिल्ह्याचा डाग पुसण्याच्या बाता करणाऱ्या लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

तरीही, २७ ऑक्टोंबर २०२३ रोजी मंडळ कार्यालयाचे शेगाव येथे गेले.



सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

प्रकल्प नाही आले / विकासाचे झाले येले / पाटबंधारे मंडळ गेले

भ्रष्टाचार जडला, श्रेयवाद नडला... नदीजोडला जिल्हा नाही जोडला !

*अधिवेशनात पुन्हा बैठकीचे सत्र *आकांक्षित जिल्हा म्हणून कलंकच मात्र

## अमरावती विद्यापिठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे कायम...

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा कलम ५(८)अंतर्गत प्रत्येक विद्यापीठाने आपल्या शैक्षणिक नियोजनासाठी उपकेंद्र उभारणे बंधनकार आहे. मात्र, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेला ३९ वर्षे होऊनसुद्धा विद्यापीठ प्रशासनाने आपले उपकेंद्र सुरू केले नाही. दरम्यान, वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, असा धोरणात्मक निर्णय विद्यापीठाच्या सिनेट सभेमध्ये झाला होता. त्याला उच्च व तंत्र शिक्षण विभागानेसुद्धा तत्वतः मान्यतही दिली होती. लोकप्रतिनिधींनी या संबंधि पुढाकारही घेतला होता. मात्र घोडे कुठे आडले तरी सुध्दा उपकेंद्राचा प्रश्न अद्यापही कायमच आहे. लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी उपकेंद्रासाठी उभी केलेली चळवळ थंडबस्त्यात पडली आहे.



पान ५ वाशीम Express सोमवार २३ डिसेंबर २०१९ सिटी न्यूज सुपरफास्ट

राजकीय उदासिनतेमुळे अमरावती विद्यापीठ उपकेंद्राचे भिजत घोंगडे

विद्यार्थ्यांची गैरसोय आता शेवटच्या आंदोलनाची गरज उपकेंद्रासाठी हवेत १०० कोटी

अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र वाशीमलाच!

खा. भावनाताई गवळी, शिक्षक आ. अॅड. किरणराव सरनाईक व माजी आ. अॅड. विजयराव जाधव यांनी उचलून धरला मुद्दा

## वाशीम येथे विद्यापिठ उपकेंद्राला तत्वत: मान्यता मिळाली होती...

वाशीम येथे उपकेंद्र व्हावे, याला उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून १ सप्टेंबर २०१० रोजी झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली होती. शिवाय उपकेंद्रासाठी १७ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून, ६० कोटींचा खर्च अपेक्षित आहे हे सुद्धा यात ठरले. हा प्रस्ताव वित्त व संबंधित विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला. १५ वर्षापासून तो रेंगाळला आहे. दरम्यान, बांधकामाच्या साहित्याचे भाव आणि कर्मचाऱ्यांचे पगारही वाढले. त्यामुळे आता हा खर्च ३०० कोटींपेक्षाही अधिक होणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव रखडला आहे. तर दुसरीकडे विद्यापिठ उपकेंद्र अकोल्याला होणार असल्याने पुन्हा एकदा वाशीम जिल्ह्यावर अन्याय झाला आहे. तरी सुध्दा उपकेंद्रासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटना निद्रावस्थेत असून त्यांना जिल्ह्याच्या विकासाचे काहीच घेणे देणे नसल्याचे पुन्हा एकदा सिध्द होत आहे.

# खामगावच्या 11 ग्रामसेवा संस्थांना अखेर मतदानाचा अधिकार !

## जिल्हा बँक निवडणुकीत नवे राजकीय समीकरण

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगाव:** जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत खामगाव तालुक्यातील ११ ग्रामसेवक सहकारी संस्थांना अखेर दिलासा मिळाला आहे. अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या या संस्थांच्या प्रतिनिधींची नावे विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी पुन्हा समाविष्ट करण्याचे आदेश दिल्याने त्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे.

जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेच्या आगामी संचालक मंडळ निवडणुकीसाठी सभासद ग्रामसेवक सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींचे ठराव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त ठरावांची छाननी करून विभागीय सहनिबंधक तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अमरावती यांनी प्राथमिक मतदार यादी प्रसिद्ध केली होती. मात्र, अवधूत टिकार व चंद्रसिंग बोराडे यांनी खामगाव तालुक्यातील ५५ पैकी १४ ग्रामसेवक सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींवर आक्षेप घेतला. संबंधित संस्थांचे संचालक थकीत संस्थांशी संबंधित असल्याचा दावा करत त्यांच्या नावांचा अंतिम मतदार यादीत समावेश करू नये, अशी मागणी करण्यात आली. या आक्षेपाची दखल घेत १४ प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीतून वगळण्यात आली होती. परिणामी, या संस्थांवर मतदानापासून वंचित राहण्याची वेळ आली होती. यानंतर वगळण्यात आलेल्या १४ पैकी ११ ग्रामसेवक सहकारी संस्थांनी ॲड.वीरेंद्र झाडोकार यांच्यामार्फत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांच्याकडे दाद मागितली.

संस्थांनी नव्याने निवडलेल्या प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. या प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर १५ जुलै रोजी विभागीय सहनिबंधकांनी ॲड. झाडोकार यांनी मांडलेला युक्तिवाद तसेच विविध उच्च न्यायालयांच्या निर्णयांचा आधार घेत ११ प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आदेश दिले.

नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम तारखेच्या पाच दिवसांपूर्वीपर्यंत विशेष कारणास्तव संस्थेला आपल्या प्रतिनिधीचे नाव बदलण्याची परवानगी आहे. याच तरतुदीचा आधार घेत न्यायालयीन निर्णयांचा संदर्भ देत विभागीय सहनिबंधकांनी ११ प्रतिनिधींचा अंतिम मतदार यादीत समावेश करण्याचे आदेश दिले.

**ॲड. वीरेंद्र झाडोकार,** विधिज्ञ

# टनकपुर- नांदेड एक्सप्रेस या लांब पल्ल्याच्या सुपरफास्ट गाडीचा थांबा उद्घाटन सोहळा संपन्न



प्रतिनिधी १६ जुलै

**मलकापुर:** मलकापुरात टनकपुर -नांदेड 17631/17632 एक्सप्रेस या लांब पल्ल्याच्या गाडीचा थांबा सोहळा उत्साहात पार पडला, या थांबा उद्घाटनाच्या सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार चैनसुख संचेती तर अतिथी डॉ. राजेंद्र फिरके, जेष्ठ पत्रकार गजानन ठोसर, मनोज पाटील, इंडिया टीव्ही चे संदीप सावजी,डॉ. विशाल झंवर,जय कॉट चे नंदलाल गांधी, संजय भडगावकर, सुरेश अग्रवाल, तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष पारसमल झाबक, स्टेशन मास्तर ठाकूर साहेब, आर पी एफ चे दीक्षित आदिंची प्रमुख उपस्थिती होती .

संदीप सावजी यांनी रेल्वे विषयी मनोगत व्यक्त केले अध्यक्षीय भाषणात आमदार चैनसुख संचेती यांनी रेल्वेला विकासात्मक निधी कमी पडणार नाही तसेच आगामी काळात 3 कोटींची विकास कामे होईल अशी घोषणा केली.

यावेळी प्रवासी संघाचे सदस्य शंकर भाई पटेल, जयंता गोदनकर, समीर जटाळे, आर आर चव्हाण, राजेंद्र ओझा, आलोक पानकर, ज्ञानदेव पाटील, देशमुख सर, गजेंद्रसिंह राजपूत,प्रमोद संचेती, नंदकिशोर कोठारी, प्रकाश चोरडिया, भन्साली, भारत शहा, जितेंद्र लोडाया, अजित मेमन, जीआरपीचे तायडे ,मोहेकार, मिलिंद डवले आदी हजर होते.

सूत्रसंचालन आभार प्रदर्शन जिल्हा प्रवासी (सेवा) संघाचे अध्यक्ष ॲड. महेंद्रकुमार बुरड यांनी केले.

# जनुना तलाव गार्डनला नमो उद्यान ऐवजी 'नमो उद्यान जनुना' नाव द्या

## ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे नगरपरिषदेला निवेदन

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगांव:** तालुक्यातील जनुना ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक जनुना तलाव व बगीच्याच्या नुतनीकरणाच्या कामात गावाचे नाव कायम ठेवावे आणि या बगीच्याचे नामकरण केवळ 'नमो उद्यान' न करता 'नमो उद्यान जनुना' असे करावे, अशी मागणी जनुना ग्रामपंचायतीचे प्रशासक, सरपंच, सर्व पदाधिकारी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने एका निवेदनाद्वारे नगरपरिषदेकडे करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जनुना ग्रामपंचायत हद्दीत असलेला हा तलाव आणि गार्डन (बगीचा) जनुना गावाचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा आहे. या परिसराशी संपूर्ण गावाची ओळख आणि नागरिकांच्या भावना जोडलेल्या आहेत. सध्या नगरपरिषदेमार्फत या तलावाच्या व गार्डनच्या नुतनीकरणाचे अत्यंत स्तुत्य काम हाती घेण्यात आले आहे, ज्याचे ग्रामस्थांनी स्वागत केले आहे.

परंतु, या नुतनीकरणानंतर सदर गार्डनचे नाव केवळ 'नमो उद्यान' केले जाणार असल्याचे समजते. तसे झाल्यास जनुना गावाचे नाव व मूळ ओळख पुसली जाण्याची भीती ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे.

त्यामुळे गावाची ऐतिहासिक ओळख कायम राहावी आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा आदर व्हावा, यासाठी नुतनीकरण होत असलेल्या बगीच्याचे नाव 'नमो उद्यान जनुना' करण्यात यावे. तसेच नुतनीकरणाच्या फलकावर व शासकीय अधिकृत नोंदीमध्ये 'जनुना' या गावाच्या नावाचा उल्लेख कायम ठेवण्यात यावा, अशी नम्र विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनावर जनुना गावातील प्रशासक सरपंच अस्मिता अमोल गव्हांदे, उपसरपंच ज्ञानदेव डवंगे ,माझी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य अमोल गोरे, अख्तर खान पठाण,अमोल गव्हांदे यांच्यासह पदाधिकारी व बहुसंख्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांना ताण नव्हे, प्रोत्साहनाची गरज!

## स्वामी बुद्धानंद महाराजांचे प्रतिपादन : संवाद कार्यक्रम

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगाव:** विद्यार्थ्यांवर अपेक्षांचे ओझे लादण्यापेक्षा त्यांना प्रोत्साहन देणे आणि इतरांशी नव्हे, तर स्वतःशी स्पर्धा करण्याची प्रेरणा देणे ही आजच्या शिक्षण व्यवस्थेची गरज असल्याचे प्रतिपादन रामकृष्ण मिशन, कोल्हापूरचे सचिव प.पू. स्वामी बुद्धानंद महाराज यांनी केले.

स्वामी बुद्धानंद महाराज यांच्या खामगाव दौऱ्यानिमित्त १३ जुलैला विविध ठिकाणी प्रवचन, संवाद व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी साडेनऊ वाजता शहरातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी व उद्योजक यांच्यासोबत संवाद कार्यक्रम झाला.

यावेळी स्वामीजींनी रामकृष्ण मिशनचे कार्य, तसेच खामगाव येथील श्री रामकृष्ण विवेकानंद संस्थेची उद्दिष्टे स्पष्ट केली आणि उपस्थितांच्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यशाळा आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मंगेश तायडे यांनी पुढाकार घेतला. कार्यशाळेला जे. व्ही. मेहता नवयुग हायस्कूल, सरस्वती विद्यामंदिर येथील शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी जिजामाता मार्ग परिसरातील मंदिरात स्वामी बुद्धानंद महाराजांचे प्रवचन झाले. या प्रवचनाला परिसरातील नागरिक, महिला व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी श्री रामकृष्ण हरी सेवा संस्थेच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### शिक्षकांसाठी कार्यशाळा

जे. व्ही. मेहता नवयुग विद्यालय येथे शिक्षकांसाठी आयोजित कार्यशाळेत त्यांनी आधुनिक शिक्षण व्यवस्थेतील बदल, वाढती गळेकापू स्पर्धा, विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण, तसेच यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा स्वार्थीपणा व उद्धटपणा या विषयांवर स्वामी बुद्धानंद महाराजांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी शिक्षकांनी त्यांना सतत प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

# टीव्ही पाहण्याच्या वादातून पत्नीसह मुलीला मारहाण

## पतीविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगाव :** टीव्हीवर कोणते चॅनल पाहायचे, या किरकोळ कारणावरून झालेल्या कौटुंबिक वादात पतीने पत्नी आणि अल्पवयीन मुलीला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना रेखा प्लॉट परिसरात घडली. याप्रकरणी खामगाव शहर पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दिलेल्या पोलिसांनी माहितीनुसार, ममता विवेक सावते (वय ३५, रा. रेखा प्लॉट, खामगाव) या पती विवेक विजयसिंग सावते यांच्यासह वास्तव्यास आहेत. विवेक सावते यांना दारूचे व्यसन असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. १४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास विवेक सावते घरी आल्यानंतर टीव्हीवरील चॅनल बदलण्याच्या कारणावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर शाब्दिक बाचाबाचीत झाले. त्यानंतर विवेक सावते यांनी पत्नीला शिवीगाळ करून घरातील प्लास्टिकच्या झाडूच्या दांड्याने मारहाण केल्याचा आरोप आहे. दरम्यान, आईला वाचविण्यासाठी मध्ये पडलेल्या अल्पवयीन मुलीलाही करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच मारहाण पत्नी व मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या तक्रारीवरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात विवेक विजयसिंग सावते याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# पेपरफुटीच्या निषेधार्थ व सोनम वांगचुक यांच्या समर्थनात 21 जुलै रोजी खामगाव मध्ये 'शिक्षण बंद'ची हाक

## विद्यार्थी कृती समितीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन



प्रतिनिधी १६ जुलै

**खामगांव:** महाराष्ट्रात वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांविरोधात आणि परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचाराच्या निषेधार्थ विद्यार्थी कृती समिती, खामगाव यांच्या वतीने आज उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, जिल्हाधिकारी, गट शिक्षणाधिकारी व पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे दि. २१ जुलै २०२६, मंगळवार रोजी खामगाव शहर व तालुक्यासह एक दिवस "शिक्षण बंद" आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. या आंदोलनात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, कोचिंग क्लासेस, ट्युशन क्लासेस, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे, संगणक प्रशिक्षण संस्था, अभ्यासिका, ग्रंथालये तसेच शिक्षणाशी संबंधित सर्व संस्थांनी स्वेच्छेने बंद ठेवून विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवेदनात पेपरफुटीतील मुख्य सूत्रधार व संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई, सर्व प्रकरणांची जलदगती न्यायालयात सुनावणी, परीक्षा प्रक्रियेत अत्याधुनिक व पारदर्शक यंत्रणा लागू करणे, दोषी अधिकारी व संस्थांना कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकणे तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतेही संरक्षण देऊ नये, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यासोबतच, पर्यावरण संरक्षण व स्थानिक नागरिकांच्या हक्कांसाठी आंदोलन करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाला व उपोषणाला विद्यार्थी कृती समितीने पाठिंबा जाहीर केला असून, त्यांच्या न्याय्य मागण्यांवर केंद्र शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. या वेळी राष्ट्रीय व राज्यस्तरीय विविध विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. निवेदनावर बंटी गव्हांदे, रितेश चोपडे, अक्षय हातेकर, सौरभ रिचारिया, शुभम राऊत,यश पैठणकर, ऋषी सपकाळ,अविनाश कोकाटे,आदींच्या सह्या होत्या.

विद्यार्थ्यांच्या भविष्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसून, शासनाने तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही विद्यार्थी कृती समितीने दिला आहे.

# ज्ञानगंगा प्रकल्प लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी पाटसऱ्या दुरुस्त कराव्यात

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगाव :** पाटबंधारे उपविभाग, खामगाव अंतर्गत ज्ञानगंगा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात सर्व लाभधारक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पाटसऱ्या तातडीने खोदून दुरूस्त कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग खामगाव यांनी केले आहे.

पावसाळ्यातील अतिरिक्त पावसाचे पाणी नदी व नाल्यांमध्ये सुरळीतपणे वाहून जावे, तसेच शेतजमिनी व उभ्या पिकांचे नुकसान टाळता यावे, यासाठी प्रत्येक लाभधारकाने आपल्या शेतातील पाटचारीची योग्य देखभाल करणे आवश्यक आहे. पाटसऱ्या योग्य स्थितीत असल्यास

पावसाचे पाणी नैसर्गिक प्रवाहातून नाल्यात वाहून जाऊन पाणी साचण्याची समस्या टळण्यास मदत होईल.

पाटचारीची दुरुस्ती न केल्यामुळे पावसाचे पाणी अडून अथवा वाहून कोणत्याही शेतकरी बांधवाच्या शेताचे किंवा पिकांचे नुकसान झाल्यास त्यास पाटबंधारे विभाग जबाबदार राहणार नाही.

तसेच अशा परिस्थितीत संबंधित नुकसानाबाबत कोणतीही नुकसान भरपाई पाटबंधारे विभागामार्फत देण्यात येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# अमृतच्या ड्रोन प्रशिक्षणातून जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या नव्या संधी

प्रतिनिधी १६ जुलै

**बुलढाणा :** महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या ड्रोन प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ बुलढाणा जिल्ह्यातील युवक-युवतींना होत असून, आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत.

या प्रशिक्षणात वैश्णवी भालेराव, राखी सेवक, चैतन्य जोशी, उमा परिहार आणि अक्षय परिहार यांनी यशस्वीरित्या सहभाग नोंदविला. प्रशिक्षणामध्ये ड्रोनची रचना व कार्यपद्धती, सुरक्षित उड्डाण, शासकीय नियम व परवानग्या, कृषी फवारणी, भू-सर्वेक्षण, मॅपिंग, हवाई छायाचित्रण, व्हिडिओग्राफी आदी विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणामुळे सहभागींच्या कौशल्यात लक्षणीय वाढ झाली असून कृषी सेवा, औद्योगिक सर्वेक्षण, डिजिटल कंटेंट निर्मिती, ड्रोन ऑपरेशन सेवा तसेच विविध तंत्रज्ञानाधारित व्यावसायिक क्षेत्रांमध्ये करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून स्वावलंबनाकडे वाटचाल करण्यासाठी हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे सहभागी युवक-युवतींनी सांगितले.

जिल्हा व्यवस्थापक जिगेश कमाणी यांनी अधिकाधिक युवक-युवतींनी अमृतच्या कौशल्य विकास व स्वयंरोजगार योजनांचा लाभघ्यावा, असे आवाहन केले आहे.

इच्छुकांनी अमृत जिल्हा कार्यालय, फ्लॅट क्र. ३०८, तिसरा मजला, बुलढाणा प्राईड बिल्डिंग, तहसील कार्यालयासमोर, बुलढाणा येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ९९२२२७९६३७ किंवा

७३८७९२५२१२ या क्रमांकावर संपर्क साधण्या आवाहन करण्यात आले.

# खामगावात 'सेल्फी पॉइंट'ला अवैध बॅनरचा विळखा; 'आय लव्ह कॉटन सिटी' झाकले !

## पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष; नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी १६ जुलै

**खामगाव:** शहरातील विकमसी शहराच्या चौकातील आकर्षक सेल्फी पॉइंटचे सध्या 'बॅनर पॉइंट' मध्ये रूपांतर झाल्याचे चित्र आहे. नगरपालिकेने काही महिन्यांपूर्वी सौंदर्गीकरणासाठी येथे विद्युत रोषणाईसह 'आय लव्ह कॉटनसीटी' अशी आकर्षक रचना उभारली होती; मात्र या ठिकाणी लावण्यात येणाऱ्या मोठ्या डिजिटल बॅनरमुळे मूळ आकर्षण झाकले जात असून, परिसराच्या सौंदर्यावरही परिणाम होत आहे.व सतत अनधिकृत बॅनर लावले जात



असल्याने सेल्फी पॉइंटचा मूळ उद्देशच हरवत आहे.

अनेकदा 'आय लव्ह कॉटनसीटी' ही अक्षरे पूर्णपणे झाकली जात असल्याने पर्यटक आणि नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत जाहिरातींवर नियंत्रण ठेवण्यात नगरपालिका प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे.

### सौंदर्गीकरण प्रकल्पांकडे दुर्लक्ष!

नगरपालिकेने विविध ठिकाणी सेल्फी पॉइंट उभारले असले, तरी त्यांच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत आहे. नियमित देखरेख व संरक्षणाच्या अभावामुळे हे प्रकल्प निष्प्रभ ठरत आहेत. विकमसी चौकातील प्रकारामुळे इतर प्रकल्पांच्या व्यवस्थापनावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### खामगावात अनधिकृत बॅनरचा वाढता विळखा!

शहरातील प्रमुख चौकांमध्ये अनधिकृत बॅनर लावण्याचे प्रमाण वाढत आहे. नियमांचे उल्लंघन करून लावण्यात येणारे हे बॅनर वाहतुकीस अडथळा निर्माण करत असून, शहराच्या सौंदर्यावरही विपरीत परिणाम करत आहेत. सार्वजनिक ठिकाणांची शिस्त बिघडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.



# अकोलेकरांनी आजारी पडावे असे कोणाला वाटते ?



## 2 कॉम्पक्टर बंद ठेवून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ !

### नायगाव डंपिंग ग्राऊंडवर विदारक चित्र

» ८ पैकी फक्त ६ कॉम्पक्टर सुरू असल्याने शहरातील कचरा वेळेवर रिकामी केला जात नाहीये. नायगाव डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यासाठी घंटागाड्यांच्या लांबच लांब लाईन्स लागल्या आहेत. गाड्या डंपिंग ग्राऊंडवरच अडकून पडत असल्याने, शहरातील गल्लीबोळांमधून नियमितपणे कचरा उचलला जात नाहीये. याचा थेट परिणाम शहरातील साफसफाईवर झाला असून नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

### साथीच्या आजारांना आमंत्रण

» सध्या पावसाळी वातावरणात बदल होत असून कचरा वेळेवर न उचलल्यास डेंग्यू, मलेरिया आणि गॅस्ट्रोसारख्या जीवघेण्या साथीच्या आजारांचा उद्रेक होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. एकीकडे आरोग्य विभागाकडून स्वच्छता राखण्याचे आवाहन केले जाते, तर दुसरीकडे स्वतः महानगरपालिकाच कॉम्पक्टर बंद ठेवून शहरात कचरा वाढवण्यास कारणीभूत ठरत आहे. अकोलेकरांच्या आरोग्याशी चाललेला हा खेळ थांबणार कधी?

प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला:** शहरातील कचरा व्यवस्थापन पूर्णपणे कोलमडले असून महानगरपालिकेच्या बेजबाबदार कारभारामुळे संपूर्ण अकोला शहर डंपिंग ग्राऊंड बनण्याच्या मार्गावर आहे. कचरा विल्हेवाटीसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले ८ पैकी २ कॉम्पक्टर गेल्या काही दिवसांपासून बंद करून ठेवण्यात आले आहेत. एकीकडे शहरात कचऱ्याचे ढीग साचत असताना आणि दुसरीकडे कचरा वाहून नेणाऱ्या घंटागाड्या डंपिंग ग्राऊंडवर तासन् तास अडकून पडत आहेत. प्रशासनाच्या या अत्यंत ढिसाळ आणि संशयास्पद कारभारामुळे 'अकोलेकरांनी आजारी पडावे असेच प्रशासनातील काही घटकांना वाटते का ?' असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

### अकोलेकरांचा संतप्त सवाल:

» 'आम्ही नियमितपणे कर भरतो, मग आम्हाला हक्काची स्वच्छता का मिळत नाही ? हा तर नागरिकांच्या जिवाशी खेळ आहे. मनपा प्रशासनाला अकोलेकरांना आजारी पाडायचे आहे का ?' असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.





# पं. स. विस्तार अधिकारी संदीप मोरे 25 हजाराची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

प्रतिनिधी १६ जुलै

**जळगाव जामोद रू** जळगाव जामोद पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीप उत्तमराव मोरे वय ५२ यांना आसलगाव ग्रामपंचायतीअंतर्गत करण्यात आलेल्या विकासकामांच्या बिलाची रक्कम मंजूर करून देण्यासाठी २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना अमरावती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले. बिलाच्या रकमेच्या तीन टक्के कमिशनची मागणी केल्याची तक्रार पडताळणीत निष्पन्न झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली असून, जळगाव जामोद तालुक्यात या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.



ACB च्या प्रसिद्धी पत्रकानुसार, तक्रारदाराने ३ जुलै २०२६ रोजी अमरावती येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराने आसलगाव ग्रामपंचायतीअंतर्गत दोन नाली बांधकामे याणि एक ऐल्टर लॉक रस्ता अशा एकूण तीन विकासकामांची कामे सन २०२५-२६ मध्ये पूर्ण केली होती. या कामांच्या बिलाची रक्कम मंजूर करून देण्यासाठी विस्तार अधिकारी संदीप मोरे यांनी बिलाच्या रकमेच्या तीन टक्के म्हणजे २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले होते. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ACB कडे धाव घेतली. तक्रारीची पडताळणी १५ जुलै २०२६ रोजी करण्यात आली. पडताळणीदरम्यान संदीप मोरे यांनी तक्रारदाराकडे २५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ACB ने सापळा रचला. त्यानुसार तक्रारदाराने ठरल्याप्रमाणे रक्कम दिल्यानंतर संदीप मोरे यांनी स्वतःच्या ताब्यात लाचेची रक्कम स्वीकारली आणि त्याचवेळी ACB च्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले.या प्रकरणी जळगाव जामोद पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती ACB ने दिली आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक वापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सचिन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक राजेश राठोड, तसेच पोलीस निरीक्षक रवींद्र सखरे, पोलीस निरीक्षक श्यामलाल निरछे, पोलीस अंमलदार अभय वाघ, वैभव चापले, मोहिन ठाकरे आणि चालक पोलीस अंमलदार राजेश बहेरे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. दरम्यान, अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांना कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त लाचेची मागणी करत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन ACB ने केले आहे. अशा तक्रारींवर तातडीने कारवाई केली जाईल, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# कृषी मंत्र्यांसमवेतच्या बैठकीला आ. रणधीर सावरकर यांची उपस्थिती

## शेतकरी हितासाठी कठोर कायदा करण्यावर भर



प्रतिनिधी १६ जुलै

**अकोला रू** महाराष्ट्रात बियाणे उत्पादन, विक्री , वितरण व साठवणूक याबाबत शेतकऱ्यांचे सर्वांगीण हीत लक्षात घेऊन परिपुर्ण आणि कठोर असा नवीन कायदा कायदा तयार करण्याकरिता कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक झाली. बैठकीला आमदार रणधीर सावरकर यांची उपस्थिती होती.

१५ जुलै रोजी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय दालनामध्ये महाराष्ट्र राज्यात बियाणे उत्पादन, विक्री, तसेच साठवणूक करणाऱ्या सर्वच संस्थांच्या संदर्भात स्वतंत्र मानक कार्यपद्धती विकसित करून राज्यभर अंमलात आणणेबाबत गठीत करण्यात आलेल्या समिती सदस्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीला आमदार रणधीर सावरकरांना पाचारण करण्यात आले होते.

राज्यातील बियाणे कादद्यासंबधाने सखोल चर्चा करण्यात आली, अस्तित्वातील कायदे व आज परीस्थितीत करावयाचे सुधारित कायदे याबाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली.

बैठकीत आमदार सावरकरांनी आजच्या खरीप हंगामातील बोगस सोयाबीन बियाणे, उलटलेल्या पेरण्या, कृषी विभागाचा बेजबाबदार व गलथान कारभार यावर सविस्तर व परखडपणे टीप्पणी केली. सोयाबीन व इतर बियाणे बाबतीत काय पद्धती असाव्यात तसेच विद्दमान कायद्यात काय बदल करायचे, याबाबत काय आणि कशा कराव्यात अशा सुधारणा आणि सूचना सुचविण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी कृषीमंत्र्यांना ६ पानी सुधारणा सादर केल्या. या सुधारणांवर अभ्यासपूर्वक निवेदन सादर केले. महाराष्ट्र राज्यात बियाणे उत्पादन, विक्री, तसेच साठवणूक करणाऱ्या सर्वच संस्थांच्या संदर्भात स्वतंत्र मानक कार्यपद्धती विकसित करून राज्यभर अंमलात आणण्यासाठी त्यांनी काही शिफारशी मांडल्या. सर्वप्रथम म्हणजे बियाणे उत्पादक कंपन्यांनी साथी पोर्टलवर आपली नोंदणी करणे अत्यावश्यक आहे

त्याशिवाय कोणत्याही कंपन्यांना राज्यात बियाणे विक्री करण्यात येऊ नये अशी स्पष्ट सूचना आमदार रणधीर सावरकरांनी केली., तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी बियाणे उपलब्ध करणाऱ्या सर्व संस्था, जसे की महाबीज, राष्ट्रीय बीज महामंडळ, राज्य बीज महामंडळे, शेतकरी उत्पादक कंपन्या, खाजगी बियाणे उत्पादक कंपन्या तसेच परराज्यातून बियाणे विक्रीसाठी आणणाऱ्या सर्व कंपन्यांनी संबंधित विक्री हंगाम सुरू होण्यापूर्वी किमान दोन महिन्यांपूर्वी त्यांचा वार्षिक सेल्स प्लॅन शासनाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात यावा. त्या मध्ये जिल्हानिहाय, गोदामनिहाय, लॉटनिहाय व नियोजित विक्रीचे प्रमाण स्पष्टपणे नमूद करण्यात यावे, जेणेकरून बियाणे नमुना संकलन व गुणवत्ता नियंत्रणाचे प्रभावी नियोजन करता येईल. सेल्स प्लॅन मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक बियाणे लॉटची तसेच घाऊक व किरकोळ विक्रेता स्तरावर त्रिस्तरीय (Three-tier) नमुना तपासणी करण्यात यावी. या त्रिस्तरीय तपासणीमुळे प्रत्येक टप्प्यावर बियाण्याच्या गुणवत्ता मानकांची पडताळणी, लॉटची ट्रेसेबिलिटी व नियामक नियंत्रण अधिक प्रभावी होऊन निकृष्ट, भेसळयुक्त अथवा मानकांशी विसंगत बियाण्यांची विक्री प्रभावीपणे रोखता येईल. याशिवाय बीयाणांचे यांचे नमुने कसे घेण्यात यावे याबाबत सुद्धा एसओपी कशी तयार करण्यात यावी याचे सुद्धा त्यांनी बैठकीमध्ये सविस्तर विवेचन केले, याशिवाय राज्यामध्ये बियाणे तपासण्याच्या प्रयोगशाळा सुद्धा मोठ्या प्रमाणात स्थापन करण्याची मागणी आमदारांचे रणधीर सावरकरांनी कृषी मंत्र्यांकडे केली.

# कर्जवसुलीच्या दबावामुळे व्यावसायिकाची आत्महत्या?

## दोन कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश
## कळंब न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

प्रतिनिधी १६ जुलै

**यवतमाळ :** कर्जवसुलीच्या नावाखाली मानसिक छळ, सार्वजनिक अपमान व धमक्या दिल्याच्या आरोपांमुळे एका व्यावसायिकाने आत्महत्या केल्याच्या प्रकरणात कळंब न्यायालयाने महत्त्वपूर्ण आदेश दिले आहेत. यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे वसुली अधिकारी शाम भुसेवार व कर्मचारी महेश धनरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून सखोल तपास करण्याचे निर्देश कळंब पोलिसांना दिले आहे. उमाबाई शालीक विरुळकर यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) कलम १७५ (३) अंतर्गत न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्यानुसार, त्यांचे पती शालीक विरुळकर यांनी यवतमाळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेकडून कर्ज घेतले होते. आर्थिक अडचणींमुळे कर्जाची परतफेड रखडल्याने शाम भुसेवार आणि महेश धनरे यांनी वारंवार फोन करून दबाव आणला, शिवीगाळ केली, सार्वजनिक ठिकाणी अपमान केला तसेच घर, दुकान आणि उपहारगृहाचा ताबा घेण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. अर्जानुसार, २८ डिसेंबर २०२४ रोजी दोन्ही कर्मचारी शालीक उपहारगृहात गेले. तेथे ग्राहकांसमोर त्यांनी शालीक विरुळकर यांचा अपमान करून धमक्या दिल्या व धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर शालीक विरुळकर मानसिक तणावात गेले आणि ३० डिसेंबर रोजी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी आपण या अपमान आणि धमक्यांमुळे हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे त्यांनी पत्नीला सांगितल्याचा उल्लेखही अर्जात आहे. घटनेनंतर उमाबाई विरुळकर यांनी कळंब पोलीस ठाणे तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रारी दिल्या.

मात्र, स्वतंत्र गुन्हा दाखल झाला नसल्याचा दावा करण्यात आला. न्यायालयाने पोलिसांचा अहवाल मागविल्यानंतर केवळ मर्ग नोंदवून तपास सुरू असल्याचे समोर आले. तसेच अर्जदार व साक्षीदारांचे जबाब नोंदविल्याचा उल्लेख असूनही त्याच्या प्रती न्यायालयात सादर करण्यात आल्या नसल्याची नोंद न्यायालयाने घेतली. न्यायदंडाधिकारी हर्षल नानासाहेब पोले यांनी उपलब्ध कागदपत्रे, तक्रारी आणि पोलिसांच्या अहवालाचा विचार करून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, २९६, ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५) अंतर्गत प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा घडल्याचे नमूद केले. त्यानुसार शाम भुसेवार व महेश धनरे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून कायद्यानुसार तपास करण्याचे आदेश कळंब पोलिसांना देण्यात आले आहेत.

### आत्महत्या नव्हे, कायदेशीर मार्ग निवडा

» जिल्ह्यात नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारत असल्याबद्दल अॅड. सलीम शाह यांनी चिंता व्यक्त केली. "आत्महत्या हा कोणत्याही समस्येचा उपाय नाही. कर्जवसुलीबाबत शेतकरी आणि कर्जदारांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा. गरजू शेतकऱ्यांना बँक कर्ज आणि कायदेशीर हक्कांबाबत मोफत मार्गदर्शन व सल्ला दिला जाईल," असे आवाहन त्यांनी केले.

# अमरावती शहरातील दोन सराईत गुन्हेगार टोळींवर मकोका अंतर्गत कारवाई

प्रतिनिधी १६ जुलै

**अमरावती :** शहरातील सराईत २ गुन्हेगार टोळींविरूद्ध मोकको कायदयान्वये कारवाईr करण्यात आली आहे. पोलीस ठाणे नागपुरी गेट येथील कलम १०९, १८९ (२), १९०, १९१(३), २९६, ६१ (२), बी.एन.एस. सहकलम ३/२५,४/२५ ऑर्म अॅक्ट, सहकलम १३५ मपोका. सहकलम ३,७ फौजदारी सुधारणा कायदा प्रमाणे या गुन्हयातील आरोपी टोळी प्रमुख शेख मुन्नु शेख सलीम व मोहम्मद सोफियान उर्फ गोलु मोहम्मद मन्नान,,अरवाज खान अहेफाज खान,सैयद तौसीव सैयद नासीर,,सुफियान वेग उर्फ सुफियान पटेल अनवर वेग उर्फ अन्नु पटेल, वसीम खाँ शफि खाँ, शेख परवेज शेख सादीक, मोहम्मद सलमान मोहम्मद उस्मान, सैयद अल्तमश सैयद गफ्फार, मोहम्मद सोहेल मोहम्मद ईसराईल, रहेमतउल्ला फईमउल्ला, साहिल खान मुस्ताक खान, शेख रेहान शेख मतीन, सैय्यद शोऐव उर्फ फैजु सैय्यद गफ्फार, गोलु, अकिल, शेख अलीम शेख सलीम, समीर जिलांनी रा. अमरावती यांचेविरूध्द दाखल गुन्हे अभिलेखानुसार टोळी प्रमुख याने स्वत: आणि त्याचे साथीदार टोळीतील सदस्यांनी सन २०१९ ते २०२६ या ०८ वर्षाच्या कालावधी सतत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द असे १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. नमुद गुन्हयातील टोळी प्रमुख शेख मुन्नु शेख सलीम याचेविरूध्द यापूर्वी देखील एम.पी.डी.ए. कायदयाअन्वये स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. तसेच इतर आरोपीतांवर देखील प्रचलीत कायदयानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील नमुद टोळीने नागपुरी गेट हद्दीत पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारी कारवाया चालूच ठेवलेले आहेत.

राजापेठ पो.स्टे. कलम ३३३. १८९ (२), १८९ (४), १९१(२), १९१ (३), ११५ (२), ३५२, ३५१ (२) (ए), १११ भारतीय न्याय संहिता. प्रमाणे या गुन्हयातील आरोपी टोळी प्रमुख यश सुनिल कडु (२५), रा. मेहरबाबा कॉलनी, अमरावती व जय दिगंबर चौधरी, रोहित दिपकराव धवस, राम अनिल जाधव, धनराज सुधीर घोंगळे, प्रेम किशोर बगाडे, जय सुनिल कडु, लवकेश उर्फ लवक्या विरेंद्र चौधरी, साहिल गणेश गव्हाळे, आदित्य देशमुख, (फरार) यांचेविरूध्द दाखल गुन्हे अभिलेखानुसार टोळी प्रमुख याने स्वत: आणि त्याचे साथीदार टोळीतील सदस्यांनी सन २०१८ ते २०२६ या ०९ वर्षाच्या कालावधी सतत शरीराविरूध्द व मालमत्तेविरुध्द असे एकुण १५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. नमुद गुन्हयातील टोळी प्रमुख यश सुनिल कडु याचेविरूध्द यापूर्वी देखील एम. पी.डी.ए. कायदयाअन्वये स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. तसेच इतर आरोपीतांवर देखील प्रचलीत कायदयानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील नमुद टोळीने राजापेठ हद्दीत पोलीस आयुक्तालयातील इतर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारी कारवाया चालूच ठेवलेले आहेत. या दोन्ही टोळीविरूध्द दाखल गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (मोक्का कायदा) चे कलम ३ (१), (ग्ग्), ३ (२), ३ (४) प्रमाणे कलम वाढ करण्याकरीता मा. पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी १५ जुलै रोजी मंजुरी दिलेली आहे. मागील २५ वर्षाच्या कार्यकाळात पोलीस आयुक्तालयात प्रथमच एकाच वेळी दोन वेगवेगळया पोलीस ठाणे हद्दीत सक्रिय असलेल्या दोन गुन्हेगारी टोळीविरूध्द मकोका कायदयान्वये प्रभावी कारवाई करण्यात आलेली आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135